**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :- ०१**

नगरसचिव कार्यालय

दिनांक :-३/०४/२०१३

प्रति,

मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती **सभा क्र. ०१ सोमवार दि. ०८/०४/२०१३ रोजी दुपारी १.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-

प्र. नगरसचिव,

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये. अहमदनगर महानगरपालिका.

**सोमवार दिनांक-०८/०४/२०१३ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| १ | मा.स्थायी समिती सभा क्रमांक ११ शुक्रवार दिनांक २३/११/२०१२, मा.स्थायी समिती विशेष सभा क्रमांक १२ गुरूवार दिनांक २९/११/२०१२, मा.स्थायी समिती सभा क्रमांक १३ सोमवार दिनांक १७/१२/२०१२ ,मा. स्थायी समिती सभा क्रमांक-१४ शुक्रवार दिनांक २८/१२/२०१२ व मा.स्थायी समिती सभा क्रमांक १५ गुरूवार दि.२४/०१/२०१३ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे. |
| २ | अहमदनगर महानगरपालिकेचे सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल (फेज-२) सावेडी अहमदनगर येथील पहिल्या मजल्यावरील ८७.५१ क्षेत्राचा हॉल क्र.४ कौटुंबिक न्यायालयाकरिता अर्जानुसार मालमत्ताकरा विरहित दरमहा भाडे घेउन कराराने भाडेतत्वावर देणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ३ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह मधील भुलतज्ञांच्या पॅनलशिपवर डॉ. संदिप रामचंद्र नळे (भुलतज्ञ) यांची कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात नेमूणक दिनांकापासून ५/१/२०१४ अखेर प्रत्येक मेजर ऑपरेशनसाठी रूपये ५००/- व प्रत्येक मायनर ऑपरेशनसाठी रूपये २५०/- याप्रमाणे अटी व शर्ती नुसार करारबध्द नियुक्ती कामी भुलतज्ञांच्या पॅनलमध्ये समाविष्ट करणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ४ | अहमदनगर महानगरपालिकेचे बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) या पदी श्री. अभिजीत आदिनाथ जोशी यांची अटी व शर्तीप्रमाणे दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती करणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ५ | अहमदनगर महानगरपालिकेचे विद्युत विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन या पदांवर उमेदवारांची अटी व शर्तीनुसार मानधनावर केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ६ | अहमदनगर महानगरपालिकेचे यु.आय.डी.एस.एस.एम.टी. केडगाव पाणी पुरवठा योजने अंतर्गत वर्कीग सर्व्हेनुसार वाढीव भागासाठी पाईप लाईन व सर्व्हिस लाईन टाकणेकामी जादा पाईप खरेदी करणेच्या वाढीव खर्चास मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ७ | अहमदनगर महानगरपालिकेच्या जलशुध्दीकरण केंद्र विळद येथील जलशुध्दीकरण प्रक्रिये दरम्यान वाया जाणारे पाण्याचा पुर्न:वापर करणेकामी प्रकल्प राबविणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ८ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये GISसंगणक प्रणाली विकसित करणेकामी तीन आर्थिक वर्षात (सन२०१२-१३, २०१३-१४,२०१४-१५) येणा-या खर्चास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |

| | |
|---|---|
| ९ | अहमदनगर महानगरपालिकेच्या शहर हद्दीतील स्थावर मिळकतीस नोंदीसाठी नियुक्त केलेल्या पथकास दिनांक ०१/०३/२०१३ पासून पुढील सहामहिन्याकरिता मुदतवाढ देणेस व नेमणूक देणेस व त्याकामीचे रूपये रू.२,९६,०००/- मानधन रकमेचे खर्चास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १० | अहमदनगर महानगरपालिकेची अमरधाम गेट जवळ एम.एस.ई.बी. इलेक्ट्रीक डी.पी. जवळील ४x६ फुट या मोजमापाची खुली जागा अर्जदार श्री. अनिल सुरेशराव वाघ , रा. नालेगांव ,अ.नगर यांना तात्पुरत्या स्वरूपात १ वर्षासाठी दरमहा भाडे रूपये ५५०/- व अनामत रक्कम रूपये ३०,०००/- घेवुन मोकळी जागा दरमहा भाडे तत्वावर देणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ११ | अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री यापदी श्री. प्रसाद मुरलीधर हातळवणे यांची अटी व शर्ती नुसार दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १२ | अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग समिती क्रमांक-४ चे कार्यक्षेत्रातील राणी लक्ष्मीबाई चौक, भुषणनगर केडगाव येथील मनपाची महिला जिम खाजगी तत्वावर चालविण्यांस देणेकामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट मंजूरीस्तव. |
| १३ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह येथे तात्पुरत्या स्वरूपात बालरोग तज्ञ (ऑनरी डॉक्टर) यांची कंत्राटी करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे मानधनावरील करारबध्द नेमणुकीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १४ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी पॅनलशिपवर कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात भुलतज्ञ यापदी अटी व शर्ती नुसार करारबध्द नियुक्ती करीता मानधन वाढविणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १५ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सावेडी न.र.यो.क्र.-४अंतिम भूखंड क्र.-१२९(पैकी )प्रोफेसरकॉलनी येथे बंदिस्त नाटयगृह बांधणेकामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट मंजूरीस्तव. |
| १६ | अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात जन संपर्क अधिकारी, लॅब टेक्निशियन, स्टाफ नर्स या पदांवर अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर केलेल्या करारबध्द नेमणूकीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १७ | अर्जदार डॉ. श्री.एस.के. आहुजा , रा. शांतीपुर, तारकुपर,अ.नगर यांचे प्रभाग समिती क्र.३ ,वॉर्ड क्रमांक ४२ या मिळकतीचे बील क्रमांक ४४२ सन १९९५ ते २०१३ अखेर पाणीपट्टी निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट |
| १८ | अहमदनगर महानगरपालिकेचे राजीव आवास योजने अंतर्गत झोपडपट्टयांचे सोशिओ इकॉनॉमिक सर्व्हे GIS, MIS, सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, बांधकामावर सुपरव्हिजन करणे इत्यादी करीता एजन्सी नियुक्तीबाबत मा.स्थायी समिती ठराव क्र.८२ दि.२४/१/२०१३ च्या ठरावान्वये प्रस्तावावर ऑफिस रिपोर्ट फेरसादर. व प्रकल्प विभाग जा.क्र. २२९५ दिनांक ०३/४/२०१३ रोजीचा ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत-** १] विषय क्र. १ - मा.स्थायी समिती सभा क्र. ११ शुक्रवार दि. २३/११/२०१२, मा.स्थायी समिती विशेष सभा क्र. १२ गुरूवार दि. २९/११/२०१२, मा.स्थायी समिती सभा क्र. १३ सोमवार दि. १७/१२/२०१२ व मा. स्थायी समिती सभा क्र. -१४ शुक्रवार दि. २८/१२/२०१२ व मा.स्थायी समिती सभा क्रमांक १५ गुरूवार दि.२४/०१/२०१३ रोजीच्या इतिवृत्ताची प्रत

२] विषय क्रमांक- २ ते १८ च्या प्रस्तावाच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०१**

विषय क्रमांक- १ सोमवार दिनांक ८/४/२०१३

ठराव क्रमांक- १ सोमवार दिनांक ८/४/२०१३

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक ११ शुक्रवार दिनांक २३/११/२०१२, मा.स्थायी समिती विशेष सभा क्रमांक १२ गुरूवार दिनांक २९/११/२०१२, मा.स्थायी समिती सभा क्रमांक १३ सोमवार दिनांक १७/१२/२०१२ ,मा. स्थायी समिती सभा क्रमांक-१४ शुक्रवार दिनांक २८/१२/२०१२ व मा.स्थायी समिती सभा क्रमांक१५ गुरूवार दि.२४/०१/२०१३रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकूर :-**मा.स्थायी समिती सभा क्र.११शुक्रवार दि.२३/११/२०१२,मा.स्थायी समिती विशेष सभा क्र.१२गुरूवार दि.२९/११/२०१२,मा.स्थायी समिती सभा क्र.१३सोमवार दिनांक १७/१२/२०१२ ,मा. स्थायी समिती सभा क्र.-१४ शुक्रवार दि.२८/१२/२०१२ व मा.स्थायी समिती सभा क्र.१५ गुरूवार दि.२४/०१/२०१३ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेसाठी मा.स्थायी समिती पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- मागील सभा क्र.११ दिनांक २३/११/२०१२, सभा क्र.१२ दिनांक २९/११/२०१२ , सभा क्र.१३ दिनांक १७/१२/२०१२, सभा क्र.१४ दिनांक २८/१२/२०१२ व सभा क्र.१५ दि.२४/०१/२०१३ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे आहे.

मा.सौ.गंधे सु.मो. :- इतिवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. कवडे उ.खं. :- मागील सभा दिनांक २३/११/२०१२, दिनांक २९/११/२०१२, १७/१२/२०१२, २८/१२/२०१२ व २४/१/२०१३ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- मा.स्थायी समिती सभा क्रमांक११ दि.२३/११/२०१२,मा.स्थायी समिती विशेष सभा क्रमांक१२ दि.२९/११/२०१२,मा.स्थायी समिती सभा क्रमांक१३ दि.१७/१२/२०१२,मा. स्थायी समिती सभा क्रमांक-१४दि.२८/१२/२०१२व मा.स्थायी समिती सभा क्रमांक १५ दि.२४/०१/२०१३रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक ११ शुक्रवार दिनांक २३/११/२०१२, मा.स्थायी समिती विशेष सभा क्रमांक १२ गुरूवार दिनांक २९/११/२०१२, मा.स्थायी समिती सभा क्रमांक १३ सोमवार दिनांक १७/१२/२०१२ ,मा. स्थायी समिती सभा क्रमांक-१४ शुक्रवार दिनांक २८/१२/२०१२ व मा.स्थायी समिती सभा क्रमांक १५ गुरूवार दि.२४/०१/२०१३ रोजीच्या कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक :- मा. सौ. गंधे सुमन मोहनीराज सही /-

अनुमोदक :- मा.श्री. कवडे उमेश खंडेराव सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०१**

विषय क्रमांक- २ सोमवार दिनांक ८/४/२०१३

ठराव क्रमांक - २ सोमवार दिनांक ८/४/२०१३

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल (फेज-२) सावेडी अहमदनगर येथील पहिल्या मजल्यावरील ८७.५१ क्षेत्राचा हॉल क्र.४ कौटुंबिक न्यायालयाकरिता अर्जानुसार मालमत्ताकरा विरहित दरमहा भाडे घेउन कराराने भाडेतत्वावर देणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. मार्केट विभाग दि.१/२/२०१३

संदर्भ- १] जिल्हा न्यायालय पत्र क्र. कार्य/३मा/१९७४/२०१२ दि.२९/३/२०१२
२] जिल्हा न्यायालय पत्र क्र. कार्य/३मा/३१९३/२०१२ दि.११/६/२०१२
३] जिल्हा न्यायालय पत्र क्र. कार्य/३मा/६६०/२०१३ दि.२९/१/२०१३

उपरोक्त संदर्भिधिन विषयास अनुसरून विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की, सावित्रीबाई फुले , व्यापारी संकुल सावेडी येथील ४ खोल्या कौटुंबिक न्यायालय स्थापनेकरीता भाडेतत्वावर मिळणेबाबतचा कौटुबिक न्यायालयाचा अर्ज मार्केट विभागास प्राप्त झालेला आहे. परंतु सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल येथील पहिल्या मजल्यावरील हॉल क्र.४ चे क्षेत्रफळ ८७.५१ चौ.मी. असुन एकच हॉल सद्यस्थितीत रिकामा आहे. याबाबत यापुर्वी सदरचा प्रस्ताव बांधकाम विभागाकडे अभिप्रायाकरीता पाठवला असता सदरचे प्रकरण दिनांक ३०/१/२०१३ रोजी या विभागाकडे प्राप्त झालेले आहे.

सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल येथील हॉल क्र. ४ कौटुंबिक न्यायालयास भाडेतत्वावर देणे असल्यास सदर बाबत मा.नगररचनाकार यांचा अभिप्राय घेणे उचित वाटते. सबब आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे मार्केट विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, मान्य , नगररचनाकार

--**--

दिनांक ४/२/२०१३

विषय- सावित्रीबाई फुले संकुल फेज-१ हॉल क्र.४ भाडे ठरविणेबाबत.

वर नमूद विषयान्वये मौजे सावेडी येथील नरयो क्र.४ मधील अंतीम भूंखड क्र.१२८ मधील सावित्रीबाई व्यापारी फुले संकुलातील फेज-१ मधील पहिल्या मजल्यावरील हॉल क्र.४ ची मागणी कौटुंबिक न्यायालयाने केलेली आहे.

त्याअनुंषगाने हॉल क्र.४ चे क्षेत्रफळ ८७.५१ चौ.मी. आहे. तसेच अहमदनगर महानगरपालिकेच्या मा.महासभेने पारित केलेल्या ठराव क्रमांक ५ दिनांक १५/०३/२००८ अन्वये सावित्रीबाई फुले व्यापारी संकुलातील फेज-१ मधील पहिल्या मजल्यावरील हॉलचे मासिक भाडे प्रति महिना १५०.०० रू. तसेच अनामत रक्कम २०००/- ठरविलेले आहेत.

त्यानुसार सदर हॉलचे भाडेमुल्य खालीलप्रमाणे

१] हॉल क्र.४ चे क्षेत्र = ८७.५१ चौ.मी.

२] भाडेमुल्य = १५०.०० रू. प्रति चौ.मी. प्रति महिना

( मा. महासभा ठराव क्रमांक ५ दिनांक १५/३/२००८ अन्वये)

सदरच्या भाडयात दर तीन वर्षानी १५% वाढ करणेस मा.महासभेने मान्यता दिलेली आहे त्यानुसार आजमितीस येणारे भाडे

= १५०.००x१५% (सन २०११ पर्यत)

= १५०.०० + (२२.५)

= १७२.५० रू.

पुन्हा १५% वाढ केल्यास २०१३ रोजी येणारे

भाडे = १७२.५० + (१७२.५० x१५% )

= १७२.५० + २५.८७५

= १९८.३७५ रू. प्रति चौ.मी. प्रति महिना

म्हणजेच २००.०० रू. प्रति महिना प्रति चौ.मी.

त्यानुसार हॉल क्र.४ चे भाडेमुल्य

= ८७.५१ x २००

= १७५०२.०० प्रति महिना

व अनामत रक्कम

= २००० x ८७.५१

= १,७५,०२०/-

सदरचे कार्यालय सरकारी कार्यालय असल्याने अनामत रकमेत सवलत दयावयाचे झाल्यास वर नमूद अनामत रकमेतून मनपास द.शा. द.शे. ६% उत्पन्न गृहीत धरल्यास येणारे भाडेमुल्य

= १,७५,०२० x ०.०६

= १०५०१.००/- प्रति वर्ष

= ८७५ रू. प्रति महिना

त्यामुळे हॉलच्या भाडयात घेणारी वाढ

= १७५०२.००+८७५

= १८३७७.००/- प्रति महिना

सबब अर्जदार यांसकडून मासिक भाडे १८३७७.००/- आकारणे योग्य होईल. मालमत्ता कर, लाईट बील इत्यादी खर्च स्वतंत्र भरणे आवश्यक आहे. अनामत रकमेत सवलत दिल्याने मासिक भाडयात काहीशी वाढ होत आहे.

तरी अर्जदार यांसकडून मालमत्ता कराविरहित १८३७७.०० रू. प्रति महिना भाडे आकारणे योग्य होईल असे मत आहे.

येणे प्रमाणे नगररचना विभाग लिपिक यांचा अहवाल असे.

यावर नगररचनाकार यांचा सहमती दर्शक सही

यावर आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, मे. स्थायी समितीचे मान्यतेस सादर करा. दि.६/२/१३

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल (फेज-२) सावेडी अहमदनगर येथील पहिल्या मजल्यावरील हॉल क्र.४ कौटुंबिक न्यायालयाकरिता अर्जानुसार मालमत्ताकरा विरहित दरमहा भाडे घेउन कराराने भाडेतत्वावर देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- किती भाडे निश्चित केले आहे.

मा.सौ. खरमाळे सं.र. :- करार किती दिवसाचा आहे.

मा.सभापती साहेब :- किती वर्षाकरीता भाडयाने दयायाचे

मार्केट विभाग प्रमुख श्री.दिवाण :- रिपोर्टमध्ये नमूद नाही.

मा.सौ. खरमाळे सं.र. :- करार किती दिवसांचा ते सांगा

मार्केट प्रमुख श्री.दिवाण :- त्यांच्या मागणीप्रमाणे आपण करारनामा करतो. त्यावेळेस कालावधी निश्चित करतो नगररचनाकार रेडीनेकनर नुसार भाडे ठरवतात.

मा.सभापती साहेब :- किती दिवसांनी भाडे वाढ करणार.

मार्केट प्रमुख श्री.दिवाण :- नियमानुसार भाडेमध्ये वाढ होत असते. क्षेत्रफळानुसार भाडे आहे.

मा.श्री.डागवाले कि.आ. :- यांना किती कालावधी करीता करार करणार ते सांगा.

मा.सौ. खरमाळे सं. र. :- आपले कर्मचारी यांना काहीच माहिती नसते. करार किती दिवसाचा ? भाडे किती ठरवणार.

मा.सभापती साहेब :- भाडे कधी किती वाढणार.

मार्केट विभाग प्रमुख श्री.दिवाण :- १५% भाडेवाढ दर ३ वर्षांनी करावी.

मा.सौ. खरमाळे सं.र. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा

मा.सौ.गंधे सु.मो. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल (फेज-२) सावेडी अहमदनगर येथील पहिल्या मजल्यावरील ८७.५१ क्षेत्राचा हॉल क्र.४ कौटुंबिक न्यायालयाकरिता अर्जानुसार मालमत्ता कर, लाईट बील विरहित दरमहा भाडे रूपये १८,३७७/- (रूपये अठरा हजार तीनशे सत्याहत्तर फक्त) घेउन कराराने दरमहा भाडेतत्वावर देण्यास मंजूरी देण्यांत येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ. खरमाळे संगीता रत्नाकर सही /-

अनुमोदक :- मा.सौ. गंधे सुमन मोहनीराज सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०१**

विषय क्रमांक- ३ सोमवार दिनांक ८/४/२०१३

ठराव क्रमांक - ३ सोमवार दिनांक ८/४/२०१३

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह मधील भुलतज्ञांच्या पॅनलशिपवर डॉ.संदिप रामचंद्र नळे (भुलतज्ञ) यांची कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात नेमूणक दिनांकापासून ५/१/२०१४अखेर प्रत्येक मेजर ऑपरेशनसाठी रूपये ५००/- व प्रत्येक मायनर ऑपरेशनसाठी रूपये २५०/- याप्रमाणे अटी व शर्ती नुसार करारबध्द नियुक्ती कामी भुल तज्ञांच्या पॅनलमध्ये समाविष्ट करणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा.आस्थापना विभाग जा.क्र. वर्क.२५९ दि.१६/२/२०१३

संदर्भ- मा.प्र. मुख्य वैद्यकीय अधिकारी कै.बा.दे. दवा. यांचेकडील जा.क्र.कै.बा.दे.दवा. व सुतिका गृह ९५२ दिनांक २/१/२०१३ अन्वयेचे पत्र

सादर,

विनंती अहवाल सादर करण्यांत येतो की, मा.प्र. मुख्य वैद्यकीय अधिकारी कै.बा.दे. दवा. यांनी त्यांचेकडील जा.क्र.कै.बा.दे.दवा. व सुतिका गृह ९५२ दिनांक २/१/२०१३ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये मा.स्थायी समिती ठराव क्र.८३ दिनांक १२/०१/२०११ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेमधील कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह येथे रूगणांच्या दैनंदिन ऑपरेशन कामी शहरातील १६ भुलतज्ञांना तात्पुरत्या स्वरूपात भुलतज्ञ म्हणून प्रत्येक मेजर ऑपरेशन करीता रूपये ५००/-(रू. पाचशे फक्त) व प्रत्येक मायनर ऑपरेशन करीता रू.२५०/- (रू. दोनशे पन्नास फक्त) यावर दिनांक ६/०१/२०११ ते ५/०१/२०१४अखेर तीन वर्षाकरिता पॅनलशिपवर करारबध्द करण्यांत आलेले आहे. तद्नंतर डॉ.श्री. संदिप रामचंद्र नळे (M.D.Auaestheolgy) यांनी भुलतज्ञ म्हणून कॉल बेसीसवर काम करण्यांस तयार असलेबाबत दिनांक २६/१२/२०१२ रोजी कै. बा.दे. दवाखाना येथे विनंती अर्ज केलेला आहे. तरी डॉ.श्री. संदिप रामचंद्र नळे, भुलतज्ञ यांच्या विनंती अर्जानुसार त्यांना स्थायी समिती ठराव क्रमांक ८३दि.१२/०१/२०११ नुसार कराराच्या अटी व शर्ती नुसार सध्याच्या भुलतज्ञांच्या पॅनलमध्ये समाविष्ट करणे उचित वाटते. असे नमुद करून सुचित केलेले आहे.

यापुर्वी मा.मुख्य वैद्यकीय अधिकारी,कै.बा.दे.दवाखाना यांनी त्यांचे कडील जा.क्र. कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह ६५३ दिनांक ७/१२/२०१०अन्वये मा.स्थायी समितीकडे प्रस्ताव सादर करून त्यामध्ये कै.बा.दे.दवा. येथे दरमहा साधारणात: ५० ते ६० मेजर ऑपरेशन व ३० ते ४० मायनर ऑपरेशन करीता भुलतज्ञांची आवश्यकता असते. दिनांक १/४/२००० पासून १) जनरल अॅनेस्थेशिया (ऑपरेशन टुबेकटोमी व्यतिरिक्त)रू.१००/-२)लोकल अॅनेस्थेशिया रू.३०/-प्रत्येक ऑपरेशन करीता फी म्हणून वसुली केली जाते. कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृहामध्ये प्रामुख्याने गरीब व मध्यम वर्गातील रूग्ण औषधोपचार व प्रस्तुती करीता येतात. त्यामुळे भुलतज्ञ अभावी ऑपरेशन करीता खाजगीरित्या भुलतज्ञांना कॉल दिल्या बद्दलची फी रूग्णांना परवडणारी नसते. त्यामुळे रूग्णांची व पर्यायाने हॉस्पीटलची गैरसोय होईल. हॉस्पीटलच्या दृष्टीने इमर्जन्सीच्या वेळी रूग्णांच्या संख्येवर परिणाम होण्याची दाट शक्यता लक्षात घेता हॉस्पीटल व रूग्णांच्या दृष्टीने भुलतज्ञांची पॅनलशिपवर नेमणूक करणे गरजेचे आहे. सदरची नेमणूक ही पॅनलशिपवर असुन भुलतज्ञांना अदा करण्यांत येणारी रक्कम ही मानधन नसुन त्यांनी केलेल्या केसेस प्रमाणे अदा करण्यांत येते त्यामुळे त्यांची नेमणूक करते

वेळी तांत्रिक खंड दिलेल्या कालावधी मधील केसेसची रक्कम अदा करणे अडचणीचे होते. दिनांक ०६/०१/२०११ ते ०५/०१/२०१४ अखेर तीन वर्षाकरीता पॅनलशिपवर प्रत्येक मेजर ऑपरेशन करीता रू.४००/- व प्रत्येक मायनर ऑपरेशन करीता रू.२००/- याप्रमाणे सोबतच्या यादीमधील अहमदनगर शहरातील इच्छुक भुलतज्ञांची पॅनलशिपवर नेमणुकी बाबत नमुद केलेले होते.

सदरच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.स्थायी समितीने ठराव क्रमाक ८३ दि.१२/०१/२०११ अन्वये खालील प्रमाणे ठराव पारित केलेला होता.

अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह येथे इच्छुक भुलतज्ञांची दिनांक ६/१/२०११ ते दिनांक ५/१/२०१४ अखेर तीन वर्षा करीता प्रत्येक मेजर ऑपरेशन करीता रूपये ४००/- ऐवजी ५००/- व प्रत्येक मायनर ऑपरेशन करीता रूपये २००/- ऐवजी २५०/- याप्रमाणे मानधनात वाढ करून भुलतज्ञांची पॅनलशिपवर नेमणूक करण्यांस मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

वरील ठरावाच्या अनुषंगाने कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना मध्ये डॉ. सौ. सायंबर व इतर १५ असे एकूण १६ भुलतज्ञांच्या पॅनलशिपवर कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात भुलतज्ञ यापदी दिनांक ६/१/२०११ ते दिनांक ५/१/२०१४ अखेर तीन वर्षा करीता प्रत्येक मेजर ऑपरेशनसाठी ५००/- व प्रत्येक मायनर ऑपरेशनसाठी रूपये २५०/- याप्रमाणे अटी व शर्ती नुसार जा.क्र. आस्थान. ३६२० दिनांक ४/२/२०११ अन्वये करारबध्द नियुक्ती कण्यांत आलेली आहे.

तद्नंतर मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी यांच्याकडील जा.क्र. कै.बा.दे.दवा. व सुतिकागृह २१२ दिनांक १२/७/२०११ च्या प्रस्तावाच्या अनुषंगाने डॉ. प्रतिभा आर.भोसले (भुलतज्ञ) यांची कै.बा.दे.दवाखान्यामध्ये भुलतज्ञांच्या पॅनलशिपमध्ये समाविष्ट करणेबाबत मा.स्थायी समितीकडे प्रस्ताव निर्णयाकरीता पाठविण्यात आला असता मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ४५ दिनांक २३/९/२०११ च्या पारित ठरावानुसार डॉ. प्रतिभा आर.भोसले (भुलतज्ञ) यांची जा.क्र. आस्था. २१४८ दिनांक २९/१०/२०११ अन्वये कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह येथे कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात भुलतज्ञ म्हणून पॅनलशिपमध्ये दिनांक ६/११/२०११ ते ५/१/२०१४ अखेर या कालावधीमध्ये समाविष्ट केलेले आहे.

मा.प्र.वैद्यकीय अधिकारी कै.बा.दे. दवाखाना यांचे उपरोक्त संदर्भिय जा.क्र. कै.बा.दे.दवा. व सुतिका गृह ९५२ दिनांक २/१/२०१३ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने कै.बाळासाहेब दवाखाना येथे तात्पुरत्या स्वरूपात भुलतज्ञ यादपदी पॅनलशिपवर डॉ.संदिप रामचंद्र नळे यांची मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ८३ दिनांक १२/०१/२०११ मध्ये नमुद केल्यानुसार सदर इतर कालावधी करीता दर्शविलेल्या मानधनानुसार पॅनलमध्ये समाविष्ट करणेबाबत निर्णय झाल्यास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी घेवुन अटी व शर्ती नुसार करारबध्द नियुक्ती बाबत कार्यवाही करणे उचित होईल.

तरी सदरचा प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदीनुसार मा.स्थायी समिती पुढे निर्णयास्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख / सहाय्यक आयुक्त यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :-भुलतज्ञांच्या पॅनलशिपवर डॉ.संदिप रामचंद्र नळे(भुलतज्ञ) यांची कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात नेमूणक प्रत्येक मेजर ऑपरेशनसाठी व प्रत्येक मायनर ऑपरेशनसाठी करारबध्द नियुक्तीकामी भुलतज्ञांच्या पॅनलमध्ये समाविष्ट करणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.सभापती साहेब :- आपण भुलतज्ञ भरले आहेत मग हे परत कशासाठी

प्र.आरोग्यधिकारी डॉ.राजूरकरः-मुलाखतीस भुलतज्ञ आले नाही.त्यामुळे भुलतज्ञ भरलेले नाहीत.पॅनलशिपवरील भुलतज्ञांना आपण कॉल करून बोलवित असतो. त्यांना ऑन कॉल केसेसे प्रमाणे चार्जेस देतो.अत्यावश्यक सेवेकरीता भुलतज्ञांच्या पॅनलशिपवर डॉ.संदिप रामचंद्र नळे (भुलतज्ञ) यांची नेमणूक करावी.

मा.सौ.गंधे सु.मो. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. शेख आरिफ शे.र. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह मधील भुलतज्ञांच्या पॅनलशिपवर डॉ.संदिप रामचंद्र नळे (भुलतज्ञ) यांची कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक दिनांकापासून ५/१/२०१४अखेर प्रत्येक मेजर ऑपरेशनसाठी रूपये ५००/- (रूपये पाचशे फक्त) व प्रत्येक मायनर ऑपरेशनसाठी रूपये २५०/-(रूपये दोनशे पन्नास फक्त) याप्रमाणे अटी व शर्ती नुसार करारबध्द नियुक्ती कामी भुलतज्ञांच्या पॅनलमध्ये समाविष्ट करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर. नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ. गंधे सुमन मोहनीराज सही /-

अनुमोदक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०१**

विषय क्रमांक- ४ सोमवार दिनांक ८/४/२०१३

ठराव क्रमांक - ४ सोमवार दिनांक ८/४/२०१३

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) या पदी श्री. अभिजीत आदिनाथ जोशी यांची अटी व शर्तीप्रमाणे दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती करणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा.आस्थापना जा.क्र. वर्क.२६० दि.१६/२/२०१३

संदर्भ- मा.प्र.शहर अभियंता बांधकाम विभाग प्रमुख यांचे कडील जा.क्र. सार्व.बांधकाम विभाग १७३२ दिनांक २८/१/२०१३ अन्वयेचे पत्र

सादर,

विनंती की, मा.प्र.शहर अभियंता , बांधकाम विभाग प्रमुख यांनी त्यांचे कडील जा.क्र. सार्व.बांधकाम विभाग १७३२ दिनांक २८/१/२०१३अन्वये इकडेस पत्र देवुन त्यामध्ये कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक पदांवर सार्व.बांधकाम विभागाकडेस असलेल्या सौ. स्नेहल राजेंद्र मुळे व श्री. अभिजीत जोशी या अभियंत्याची सहा महिन्यांची मुदत संपलेली असुन त्यांना पुढील सहा महिन्याचे कालावधीसाठी नेमणूक देणेबाबत आपले विभागाकडून प्रस्ताव ठेवणेत यावा. असे नमुद करून सुचित केलेले आहे.

वरील पत्रामध्ये नमुद सौ. स्नेहल राजेंद्र मुळे यांची यापुर्वी केलेल्या कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) या पदी दरमहा मानधनावर सहा महिन्याकरिता केलेल्या करारबध्द नियुक्तीची मुदत ही समाप्त झालेली असल्याने त्यांची यापुर्वीच्या मा.प्र. शहर अभियंता, बांधकाम विभाग प्रमुख यांचे अहवालाच्या अनुषंगाने त्यांची त्यांना तांत्रिक खंड देवून पुढील सहा महिन्याकरीता दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती बाबतचा स्वतंत्रयारित्या प्रस्ताव यापुर्वीच सादर करण्यात आलेल्या असुन सदरच्या प्रस्तावानुसार त्यांची पुढील तांत्रिक खंड देवून सहा महिन्याकरिता मानधनावर नियुक्ती बाबत कार्यवाही करण्यात आलेली आहे.

यापुर्वी मा.प्र. शहर अभियंता, बांधकाम विभाग प्रमुख यांनी बांधकाम विभागामध्ये अभियंत्येची संख्या अत्यंत कमी प्रमाणात आहेत व उपनगरामध्ये विविध विकास कामांबाबतची कार्यवाही करण्यात येत असून सद्यस्थितीमध्ये नगरोत्थान अंतर्गत रस्त्यांच्या कामाबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. त्याकामी बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कनिष्ठ अभियंता (सिव्हील) कंत्राटी करारानुसार तातडीने मिळणेबाबत सूचित केलेले होते.

त्याअनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेच्या बांधकाम विभाग व इतर अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता व इतर तांत्रिक पदांवर अटी व शर्ती प्रमाणे ६ महिन्याकरिता दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्तीबाबत दिनांक ११/०७/२०१२ रोजी दैनिक सामना व नगर टाईम्स या वर्तमानपत्रामध्ये जाहिराती प्रसिध्दीस देवून थेट पध्दतीने (Walk In Interview) नुसार उमेदवारांच्या मुलाखती दिनांक १७/०७/२०१२ रोजी आयोजित करण्यांत आलेल्या होत्या.

सदर जाहिरातीच्या अनुषंगाने मा.आयुक्त तथा अध्यक्ष , निवड समिती, अहमदनगर महानगरपालिका यांचे अध्यक्षतेखाली मा.निवड समितीने उपस्थित उमेदवारांच्या मुलाखती घेवून पात्र ठरवून उमेदवारांची निवड केलेली होती.

त्यानुसार निवड झालेले श्री. अभिजीत आदिनाथ जोशी यांची बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेकरिता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) या पदी अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरिता रू.१०,०००/- या दरमहा मानधनावर बांधकाम विभाग मध्ये जा.क्र. आस्था./ कंत्राटी करारबध्द नेमणुक २३५० दि.२४/०७/१२ अन्वये करारबध्द नियुक्ती करण्यांत आलेली होती.

सदरच्या आदेशामध्ये अट क्र.१४ मध्ये तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) या पदांच्या दरमहा मानधनवाढी संदर्भात मा.स्थायी समितीच्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यांत येईल असे नमुद केलेले होते.

यापुर्वी पाणी पुरवठा विभाग व बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता या पदी मानधनावर करारबध्द नियुक्ती बाबत वर्तमान पत्रामध्ये वेळोवेळी जाहिराती प्रसिध्दीस देण्यांत आलेल्या होत्या. सदर प्रसिध्दी जाहिरातीच्या अनुषंगाने दरमहा मानधन हे अल्प स्वरूपाचे असल्याने उमेदवारांचा थेट मुलाखती करीता अत्यंत कमी प्रमाणात प्रतिसाद मिळालेला होता. त्यामुळे सदर थेट पध्दतीचे मुलाखीस कमी प्रमाणात प्रतिसाद मिळत असल्याने सदरचे दरमहा मानधन रू.२०,०००/- पर्यत बाबतचा प्रस्ताव निर्णयाकरिता मा.स्थायी समिती कडे जा.क्र. आस्था. १६३ दि.०५/०६/२०१२ अन्वये पाठविण्यांत आलेला होता.

सदर प्रस्तावावर मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ३६ दि.१४/०८/२०१२ अन्वये खालील प्रमाणे ठराव पारित केलेला होता.

अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा व बांधकाम विभागाकडील अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार अटी व शर्तीप्रमाणे तात्पुरत्या स्वरूपात नेमावयाच्या कनिष्ठ अभियंता या पदाचे दरमहा मानधन वाढवून रूपये २०,०००/- निश्चित करण्यांत मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर खर्च मंजूर नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी. असे नमूद केलेले होते.

त्यानुसार सदर ठरावाच्या अनुषंगाने श्री. अभिजीत आदिनाथ जोशी यांची सदर वरील केलेल्या करारबध्द नियुक्तीच्या कालावधीतील दरमहा मानधन रू.१०,०००/- वरून रू.२०,०००/- करणे बाबतचा प्रस्ताव दि.१९/१०/२०१२ अन्वये सादर करण्यात आलेला होता. सदर प्रस्तावास मंजुरी प्राप्तीनंतर श्री. अभिजीत आदिनाथ जोशी यांची जा.क्र. आस्था.४९४८दि.२७/११/२०१२ अन्वये दि.१४/०८/२०१२ पासून ते दि.२३/०१/२०१३ पर्यत या कालावधीमध्ये दरमहा मानधन रू.२०,०००/- (अक्षरी रूपये वीस हजार मात्र ) करण्यांत आलेले होते.

बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी अटी व शर्ती श्री. अभिजीत आदिनाथ जोशी यांची जा.क्र. आस्था./ कंत्राटी करारबध्द नेमणूक २३५० दि.२४/०७/२०१२अन्वये सहा महिन्या करिता केलेल्या करारबध्द नियुक्तीची मुदत ही सद्यस्थितीमध्ये दि.२३/०१/२०१३ रोजी समाप्त झालेली आहे.

तरी मा.प्र.शहर अभियंता, बांधकाम विभाग प्रमुख यांचे कडील संदर्भिय जा.क्र. सार्व.बांधकाम विभाग १७३२ दि.२८/०१/२०१२ अन्वयेच्या पत्राच्या अनुषंगाने बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार श्री. अभिजीत आदिनाथ जोशी यांची तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) या पदी अटी व शर्तीनुसार एक दिवसाचा तांत्रिक खंड देवून सहा महिन्याकरिता मा.स्थायी समिती ठराव क्र.३६ दि.१४/०८/२०१२ च्या ठरावानुसार दरमहा रूपये २०,०००/-(अक्षरी रूपये वीस हजार मात्र) या मानधनावर करारबध्द नियुक्ती करणे बाबत पूर्व मंजूरी करीता मा.स्थायी समिती पुढे सदरचा प्रस्ताव निर्णयास्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख / सहाय्यक आयुक्त यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--** --

## चर्चा :-

मा.सभापती साहेब :- बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) या पदी श्री. अभिजीत आदिनाथ जोशी यांची दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती करणे विषयी प्रस्ताव आहे.

ऑफिस रिपोर्ट वाचण्यांत आला.

शहर अभियंता श्री. कुलकर्णी :- बांधकाम विभागाकडील तीन इंजिनिअर्सचा करार संपतो. त्यांच्या प्रस्ताव मंजुरीस बराच कालावधी लागतो त्यामुळे कामात अडचणी येतात. तांत्रिक खंड देवून मुदतवाढ द्यावी.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- आता फक्त जोशीचाच विषय घेता येईल.

उपायुक्त (सा) डॉ. डोईफोडे :- मानधनावरचे इंजिनिअर करीता विभागाकडून प्रस्ताव द्यावा लागेल.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- पाणी पुरवठा सारख्या महत्वाच्या विभागाकडे कामगार कमी आहेत ते मानधनावर घ्या.

मॅके.इंजि.श्री.निकम:-आमच्याकडील ५लोक रिटायर्ड होतात. तसेच काही रिटायर्ड झालेले आहेत. त्याकरीता कर्मचा-यांची वेळोवेळी लेखी मागणी केलेली आहे.

आस्थापना प्रमुख श्री. सोनवणे :- तांत्रिक पदे आहेत त्यामुळे ते घेता येत नाहीत.

मा.श्री. डागवाले कि.आ. व मा.श्री. भोसले ग.पुं. :- का घेता येत नाही ते सांगा लवकर करून घ्या.

मॅके. इंजि. श्री.निकम :- मानधनावर लोक दया.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- मानधनावर का घेता येत नाही व्हॉलमन का घेता येत नाही.

आस्थापना प्रमुख श्री. सोनवणे :- रिपोर्ट ठेवतो.

शहर अभियंता श्री. कुलकर्णी :- नगरोत्थान योजनेमधील बालिकाश्रम रस्ता, मुकुंदनगर , कोठी रोड, केडगांव देवी रोड येथे कोटयावधीची कामे सुरू आहेत. हे सर्व रस्ते महत्वाचे आहेत. त्यामुळे ती दर्जेदार होणे गरजेचे आहे. आपल्याकडील अभियंत्याना त्यांच्या प्रभागातील कामे पाहून या कामाकडे लक्ष देण्यास वेळ मिळत नाही. त्यांना त्यांच्या प्रभागातच मोठया प्रमाणात कामे असतात. या प्रत्येक कामावर एक अभियंता मानधनावर नेमणे आवश्यक आहे. त्याकरिता ५ अभियंता मानधनावर नेमणूक करणे आवश्यक आहे.

मा.सभापती साहेब :- प्रस्ताव द्या.

मॅके. इंजि. श्री.निकम पी.जे. :- अभियंत्याची आवश्यकता असल्याने निर्णय घेण्यांत यावा.

मा.श्री.डागवाले कि.आ.:-ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.तसेच मानधनावरील नेमणूक करण्यांत आलेल्या अभियंत्याना तांत्रिक खंड देवून पुर्ननेमणूक देण्यांत यावी व प्रस्ताव अंतिम मंजुरीस मा.स्थायी समितीकडे पाठवावा.व मानधनावर ५अभियंते नेमणुकीबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यांत यावी.

मा.श्री. कवडे उ.खं. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.अभियंत्याची आवश्यकता पाहता मानधनावरील नेमणूक करण्यांत आलेल्या अभियंत्याना तांत्रिक खंड देवून पुर्ननेमणूक देण्यांत यावी व प्रस्ताव अंतिम मंजुरीस मा.स्थायी समितीकडे पाठवावा तसेच पाच अभियंते मानधनावर घेण्यांत यावे.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा. तसेच शहर अभियंता यांचे मागणीनुसार नागरिकांच्या सुविधेच्या दृष्टीकोनातुन प्रशासनास येणा-या कामकाजातील अडचणी विचारात घेता मानधनावरील नेमणूक करण्यांत आलेल्या अभियंत्याना वैद्यकीय अधिकारी , लॅब टेक्नीशियन यांना ज्याप्रमाणे प्रमाणे तांत्रिक खंड देवून नेमणूक केली जाते. त्याप्रमाणेच त्यांचे काम समाधानकारक असल्यास तांत्रिक खंड देवून पुर्ननेमणूक देण्यांत यावी व प्रस्ताव अंतिम मंजुरीस मा.स्थायी समितीकडे सादर करण्यात यावा. कंत्राटी पध्दतीने मानधनावर ५अभियंते घेण्यांस सर्वानुमते मंजूरी दयावी. नेमणूकीबाबतची कार्यवाही नियमानुसार करण्यांत यावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) या पदी श्री. अभिजीत आदिनाथ जोशी यांची अटी व शर्तीप्रमाणे दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती करणेबाबत सभेत झालेल्या चर्चेनुसार पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

ऑफिस रिपोर्टानुसार अहमदनगर महानगरपालिकेचे बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) या पदी श्री.अभिजीत आदिनाथ जोशी यांची अटी व शर्तीनुसार सहामहिन्याकरिता दरमहा रूपये २०,०००/- (रू. वीस हजार फक्त) या मानधनावर करारबध्द नियुक्ती करण्यास मंजुरी देण्यांत येत आहे.

तसेच शहरअभियंता यांचे मागणीनुसार नागरिकांच्या सुविधेच्या दृष्टीकोनातुन प्रशासनास येणा-या कामकाजातील अडचणी विचारात घेता बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार मानधनावरील नेमणूक करण्यांत आलेल्या अभियंत्यांना,वैद्यकीय अधिकारी,लॅब टेक्नीशियन यांना तांत्रिक खंड देवून पुर्ननेमूणक करणेबाबत पुर्वी झालेल्या मा.स्थायी समितीचा ठरावाप्रमाणेच त्यांचे काम समाधानकारक असल्यास तांत्रिक खंड देवून पुर्ननेमणूक देण्यांत यावी व प्रस्ताव अंतिम मंजुरीस मा.स्थायीसमितीकडे सादर करण्यात यावा व कंत्राटी पध्दतीने मानधनावर ५(पाच)अभियंते घेण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येत आहे.५अभियंते नेमणूकीबाबतची प्रक्रिया नियमानुसार राबविण्यांत यावी. खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. डागवाले किशोर आसाराम सही /-

अनुमोदक :- मा.श्री. कवडे उमेश खंडेराव. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०१**

विषय क्रमांक- ५ सोमवार दिनांक ८/४/२०१३

ठराव क्रमांक - ५ सोमवार दिनांक ८/४/२०१३

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे विद्युत विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन या पदांवर उमेदवारांची अटी व शर्तीनुसार मानधनावर केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा.आस्थापना जा.क्र. वर्क.२६२ दि.२२/२/२०१३

संदर्भ- इलेक्ट्रीक विभाग प्रमुख यांचे कडील जा.क्र. २२६ दिनांक २२/१०/२०१२ चा प्रस्ताव

विनंती की,विद्युत विभाग प्रमुख यांनी त्यांचे कडील जा.क्र.इलेक्ट्रीक विभाग२२६दिनांक २२/१०/१२अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये "अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील दैनंदिन पथदिवे सुस्थितीत ठेवण्यात येतात. यासाठी अ.नगर मनपाच्या हद्दीतील पथदिवे दैनंदिन दुरूस्ती, देखभाल व प्रॉपर्टीज मधील लाईट व्यवस्था सुरळीत ठेवणेसाठी तांत्रिक वायरमन कर्मचारी वर्ग अपुरा आहे कारण पुर्वीचे जुने शहर तद्नंतर हद्दवाढ होउन झालेली महानगरपालिची स्थापना व त्यावेळी कार्यरत कर्मचारी इ.बाबींचा विचार करता वाढत्या लोकवस्तीमुळे उपनगर भागामध्ये दिवसेदिवस पथदिव्यांची संख्या वाढत आहे. त्याप्रमाणात कर्मचारी संख्याबळ वाढत नसुन दिवसेंदिवस कमी होतच आहे. तसेच सद्यस्थितीत पथदिवे दुरूस्ती व प्रॉपर्टीज मधील लाईट व्यवस्थेकरिता कार्यरत वायरमन, मदतनीस यांची संख्या व या विभागातील दैनंदिन दुरूस्ती,देखभालीचे स्वरूप विचारात घेता आजमितीस उपलब्ध कर्मचा-यांमधुन काम करण्यांचा आटोकाट प्रयत्न चालू आहे. परंतु यापैकी एक कर्मचारी विजेचा धक्का बसुन आजारी पडलेला आहे.तसेच त्यापैकी एखादा कर्मचारी आजारी पडल्यांस व तातडीने रजेवर गेल्यास सदर कर्मचारी लाईटचे काम करीत असलेल्या नागरी भागासाठी पर्यायी कर्मचारी देणे जिकरीचे होउन जाते. त्यामुळे पथदिवे बंद व इतर प्रॉपर्टीजचे कामाबाबतच्या दिवसेदिवस तक्रारी वाढतच आहेत. सदरची बाब ही अत्यंत गंभीर स्वरूपाचे आहे. वरील नमुद बाबी मनपाच्या सेवेच्या दृष्टीने गंभीर असल्याने मा.आयुक्त साहेब मा.पदाधिकारी साहेब यांनी कर्मचारी उपलब्ध करून देणेबाबत सुचित केलेले आहे. तरी अहमदनगर महानगरपालिकेच्या विद्युत विभागाचा गंभीर परिस्थितीचा विचार होउन १०वायरमन (कंत्राटी पध्दतीने अथवा इतर पर्यांयांचा विचार करून) तात्काळ उपलब्ध करून देणेबाबत आस्थापना विभागास आदेशित करावे."असे नमुद करून सुचित केलेले होते.

सदरच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने त्यानुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या विद्युत विभाग अत्यावश्यक सेवेसाठी तातडीने कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन या पदांवर अटी व शर्ती नुसार सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द नियुक्ती करीता थेट पध्दतीने (Walk In Interview) नुसार उमेदवारांच्या दिनांक ०७/११/२०१२ रोजी मुलाखती करीता दिनांक ३०/१०/२०१२ रोजीच्या दैनिक पुढारी व दिनांक २७/१०/२०१२ रोजीच्या दैनिक नवा मराठा या वर्तमान पत्रामध्ये जाहिराती प्रसिध्दीस देवुन व सदर जाहिराती मधील अटी व शर्ती बाबतचा तपशिल हा अहमदनगर महानगरपालिकेच्या नोटीस फलकावर डकवुन तसेच अहमदनगर महानगरपालिकेच्या w.w.w.amc.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करून मा. निवड समितीने थेट पध्दतीने उपस्थित उमेदवारांच्या मुलाखती घेवुन पात्र ठरवुन उमेदवारांची निवड केलेली होती.

त्यानुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या विद्युत विभाग अत्यावश्यक सेवेसाठी तातडीने कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन या पदांवर अटी व शर्ती नुसार सहा महिन्याकरीता मानधनावर खालील प्रमाणे उमेदवारांची करारबध्द नियुक्ती ही विद्युत विभागामध्ये करण्यांत आलेली आहे.

| अ. नं. | उमेवारांचे नांव | तात्पुरत्या स्वरूपात पदनाम | दरमहा मानधन | आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणुक जा.क्र. व दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | सुभाष बापुराव सुळ | वायरमन | ६०००/- | ८१४९ दि. ११/१२/२०१२ |
| २ | लोंढे नवनाथ बाळासाहेब | वायरमन | ६०००/- | ८१४९ दि. ११/१२/२०१२ |
| ३ | महारपुडे कैलास भाउसाहेब | वायरमन | ६०००/- | ८१४९ दि. ११/१२/२०१२ |
| ४ | इकबाल सुलेमान सय्यद | वायरमन | ६०००/- | ८१४९ दि. ११/१२/२०१२ |
| ५ | मुसमाडे अमोल भारस्कर | वायरमन | ६०००/- | ८१४९ दि. ११/१२/२०१२ |
| ६ | सय्यद शोएब जावेद | वायरमन | ६०००/- | ८१४९ दि. ११/१२/२०१२ |
| ७ | देवरे गितेश आण्णासाहेब | वायरमन | ६०००/- | ८१४९ दि. ११/१२/२०१२ |
| ८ | काटकर लंकेश तुकाराम | वायरमन | ६०००/- | ८१४९ दि. ११/१२/२०१२ |
| ९ | झिरपे विशाल विक्रम | वायरमन | ६०००/- | ८१४९ दि. ११/१२/२०१२ |
| १० | ऋषीकेश दिलीप केदार | वायरमन | ६०००/- | ८१४९ दि. ११/१२/२०१२ |

वरील केलेल्या करारबध्द मानधनावरील कालावधीतील नियुक्तीच्या आदेशाप्रमाणे सद्यस्थितीमध्ये अनु.क्र. ५ ते १० हे उमेदवार संबंधित विभागामध्ये रूजू झालेले नसल्याने त्यांच्या ऐवजी प्रतिक्षा सुचीवरील निवड झालेल्या १. जाधव सचिन मोहन व २. डहाळे सौरभ भाउसाहेब यांची सदर कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी सहा महिन्याकरीता अटी व शर्ती नुसार दरमहा मानधनावर जा.क्र. आस्था./ कंत्राटी करारबध्द नेमणूक ९४२८ दिनांक २१/२/२०१३ अन्वये करारबध्द नियुक्ती करण्यांत आलेली आहेत.

तरी वरील प्रमाणे संबंधित उमेदवारांची विद्युत विभाग अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरूपात पदांवर कंत्राटी करारानुसार सहा महिन्याकरीता अटी व शर्ती नुसार मानधनावर केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे करीता प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख / सहाय्यक आयुक्त यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- विद्युत विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन या पदांवर उमेदवारांची अटी व शर्तीनुसार मानधनावर केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.सभापती साहेब : - किती वायरमन आहे

इले. प्रमुख श्री. सावळे :- १० वायरमन घेतले आहे.
मा.सौ. खरमाळे सं.र. :- सावेडीमध्ये वायरमन नाहीत.
इले. प्रमुख श्री. सावळे :- तीन वायरमन सावेडी विभागामध्ये दिलेली आहेत.
मा.श्री.सातपुते दि.ना. :- कार्योत्तर मंजूरी असल्याने ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.
मा.श्री.शेख आरिफ शे.र. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.
मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टमध्ये नमूद उमेदवारांना कार्योत्तर मंजूरी असल्याने ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे विद्युत विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन या पदांवर ऑफिस रिपोर्टमध्ये नमूद उमेदवारांची अटी व शर्तीनुसार सहामहिन्याकरीता मानधनावर केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक : मा.श्री. सातपुते दिलीप नानाभाउ सही /-

अनुमोदक :- मा.श्री.शेख आरिफ शेख रफिउद्दीन सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०१**

विषय क्रमांक- ६ सोमवार दिनांक ८/४/२०१३

ठराव क्रमांक - ६ सोमवार दिनांक ८/४/२०१३

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे यु.आय.डी.एस.एस.एम.टी. केडगाव पाणी पुरवठा योजने अंतर्गत वर्कींग सर्व्हेनुसार वाढीव भागासाठी पाईप लाईन व सर्व्हिस लाईन टाकणेकामी जादा पाईप खरेदी करणेच्या वाढीव खर्चास मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. पाणी पुरवठा जा.क्र. ६३४ दि.२१/२/२०१३

संदर्भ :- १.उपअभियंता ,म.जी.प्रा. प्रकल्प सेवा विभाग अहमदनगर यांचे ताशा /२० दि.०२/०१/२०१३

२. उपअभियंता ,म.जी.प्रा. प्रकल्प सेवा विभाग अहमदनगर यांचे ताशा /२० दि.०५/०१/२०१३

३.उपअभियंता ,म.जी.प्रा. प्रकल्प सेवा विभाग अहमदनगर यांचे ताशा /२६ दि.१२/०२/२०१३

मा.सादर,

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट सादर की, यु.आय.एम.एस.एस.एम.टी. केडगाव पाणी पुवठा योजने अंतर्गत वितरण व्यवस्थेसाठी वेगवेगळया व्यासाची ७८ कि.मी. लांबीची वितरण नालिका तसेच गुरूत्व वाहिनीसाठी ८६८३४ मीटर लांबीची पाईप लाईन मंजूर आहे. सदरचे काम प्रगतीपथवार असून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे.

सद्यस्थितीत वितरण व्यवस्थेचे ७४ कि.मी. काम व गुरूत्ववाहिनी ५.८ कि.मी. चे काम पूर्ण झालेले आहे.

या अनुषंगाने म.जि.प्रा. चे वरील संदर्भिय पत्रे प्राप्त झाले असून

**अ)** संदर्भिय पत्र १ अन्वये वितरण व्यवस्थेअंतर्गत ३०० एमएम व त्यापेक्षा मोठया व्यासाकरिता सर्व्हिस पाईप लाईनचे बाजूने १५० एमएम व्यासाची डी.आय. पाईप लाईन प्रस्तावीत करण्यात येत असून त्याबाबतचे सविस्तर नकाशे देखील सादर केलेले आहेत. तसेच वर्कींग सर्व्हेनुसार काही भागातील पाईप लाईन नव्याने प्रस्तावीत करून त्यांचेकडील प्राप्त अहवालानुसार खालीलप्रमाणे डी.आय. पाईप्स आवश्यक असल्याचे इकडेस कळविले आहे.

| **Dia** | **Quantity** |
|---|---|
| **Service Pipe Line** | |
| 150 | 8280 |
| **Extended pipe Line** | |
| 100 | 575 |
| 150 | 4012 |
| 200 | 1500 |

योजनेचे प्राथमिक सर्व्हेक्षणाचे काम सन २००५-०६ मध्ये झाले असून योजना प्रत्यक्षात सन २००८-२००९ मध्ये मंजूर होवून प्रत्यक्ष कामास सुरूवात झाली. योजनेचे PMC चे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे सोपविण्यात आलेले आहे. स्विकृत करारनाम्यानुसार PMC कडून वर्कींग सर्व्हेचे काम त्वरीत होणे आवश्यक होते. तथापी त्यांचेकडून वेळेत न झाल्याने दि.०९/१२/२०११ रोजी मा.मुख्य अभियंता, म.जी.प्रा. प्रादेशिक विभाग, पुणे यांचे उपस्थितीत आढावा बैठक घेण्यात आली. व त्यामध्ये नैसर्गिक वाढीनुसार ज्या ज्या प्रभागात लोकवस्ती वाढलेली आहे. अगर नव्याने विकसित झालेल्या लोकवस्तीत पाईप लाईन टाकणेसंबंधी हायड्रोलिक डिझाइनसह वर्कींग सर्व्हेचा अहवाल PMC कडून घेणेसंबंधी निर्णय घेण्यात आला. त्यानुसार म.जी.प्रा. कडून मंजूर असलेल्या ६ प्रभागाच्या कक्षेत व वाढीव लोकवस्तीसाठी वर्कींग सर्व्हेचा अहवाल प्राप्त झालेला आहे.

सदरच्या वर्कींग सर्व्हेनुसार डी.आय. पाईप्सच्या परिमाणात बदल होत आहे. यापूर्वी मे. जिंदाल सॉ. लि. यांना दिलेल्या पुरवठा आदेशाप्रमाणे त्यांचेकडून सर्व प्रकारचे पाईपचा पुरवठा झालेला असून त्यांचे सर्व देयके सुध्दा अदा करण्यात आलेले आहे.

म.जी.प्रा. चे संदर्भिय पत्रानुसार केडगाव प्रभागाच्या यापूर्वी झालेल्या सर्व्हेक्षणामध्ये न घेतलेल्या भागाचा वर्कींग सर्व्हे केला असून त्यानुसार आवश्यक असलेले विविध व्यासाचे डी.आय. के-७ पाईप नव्याने खरेदी करावे लागणार आहेत. यापूर्वीच्या दि.२३/०८/२०१२ मधील मे.जिंदाल सॉ. लि. यांचेशी झालेल्या करारनाम्यानुसार पुढीलप्रमाणे खर्च रू.१,७७,३५,३००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

| **Diameter of DI K-७ Pipes** | **Quantity in Rmt** | **Rate as Pet Agreement** | **Amount** |
|---|---|---|---|
| 100 | 575 | 832 | 478400 |
| 150 | 12300 | 1228 | 15104400 |
| 200 | 1500 | 1435 | 2152500 |
| | | | **17735300** |

**ब )** संदर्भिय पत्र क्र.२ व ३ अन्वये गुरूत्ववाहिनी अथंरणे व जोडणे करिता लागणा-या पाईप्सच्या परिणामाबाबत कळविले आहे. PMC यांनी संदर्भिय पत्र २ नुसार गुरूत्ववाहिनीच्या लागणा-या डी.आय. पाईप्सच्या आवश्यक त्या परिणामाबाबत इकडेस कळविले होते.

| **Sr No.** | **Gravity Mains** | |
|---|---|---|
| 1 | 300 mm व्यास | 100 मीटर |
| 2 | 350 mm व्यास | 400 मीटर |

तथापी पुनश्चः खात्री करणेच्या दृष्टीकोनातून म.जी.प्रा. ने परत वर्कींग सर्वे केला व त्याचा अहवाल इकडेस सादर केला असता पूर्वीच्या सादर केलेल्या वर्कींग सर्व्हेनुसारचे लांबीत अंदाजे ५०० मीटरची तफावत असलेचे महानगरपालिकेच्या निदर्शनास आले. याबाबत दि.०८/०२/२०१३ चे बैठकीत पुनश्च चर्चा झाली असता PMC यांनी संदर्भिय पत्र क्र.३ अन्वये अंतीम अहवाल दिला असून त्यानुसार मे. जिंदाल सॉ. लि. यांचेकडून आवश्यक असलेले विविध व्यासाचे डी.आय. के-७ पाईप नव्याने खरेदी करणेकामी खालीलप्रमाणे तपशिल नमूद केले आहे.

| **Diameter of DI K-७ Pipes** | **Quantity in Rmt** |
|---|---|
| 300 mm | 100 |
| 350 mm | 400 |

वरील नमूद पाईप्स खरेदी करणेसाठी दि.२३/०८/२०१२ च्या मे. जिंदाल सॉ. लि. यांचेशी झालेल्या करारनाम्याप्रमाणे खर्च रूपये ५,३६,४००/- इतका अपेक्षित आहे.

| **Diameter of DI K-७ Pipes** | **Quantity in Rmt** | **Rate as Pet Agreement** | **Amount** |
|---|---|---|---|
| 300mm | 100 | 2398 | 239800 |
| 350mm | 100 | 2966 | 296600 |
| | | | **536400** |

वरील प्रस्तावानुसार पाईप खरेदीसाठी एकूण रक्कम रूपये १,८२,७१,७००/- खर्च अपेक्षित आहे. यापूर्वी मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १७ दिनांक १६/९/२००८अन्वये रूपये १९,०३,७१,७२२/- च्या डी.आय.के-७ व के-९ पाईप खरेदीस मान्यता मिळालेली आहे. परंतु प्रत्यक्षात फक्त रूपये १७,७९,००,८०१/- इतका खर्च आलेला आहे. त्यामुळे पाईप खरेदीत रू. १,२४,७०,९२१/-ची बचत झाली आहे.

वरील प्रस्तावाप्रमाणे प्रकल्प अहवाला अहवाला व्यतिरिक्त सर्व्हीस लाईन व विस्तारित भाग याचा खर्च वरील बचत रक्कम व मनपा फंडातून केल्यास केडगाव प्रभागाची पाणी पुरवठा योजना, इंदिरानगर , विद्यासागर कॉलनी, ताराबाग , श्रीराम कॉलनी इत्यादी भाग वगळून पूर्ण होईल.

करिता प्रस्तावीत प्रमाणे रू. १,८२,७१,७००/- च्या पाईप खरेदीस व वाढीव रक्कम रूपये ५८,००,७७९/- च्या खर्चास मा.स्थायी समितीची मंजूरी घ्यावी लागणार आहे. तसेच

वरील **"अ"** व **"ब"** नुसार

१] **अ** मधील नमूद प्रमाणे वर्कींग सर्व्हेसह संकल्पनास मंजूरी देणेस

२] **ब** मधील पाईप पुरवठा करून घेणेसाठी अंदाजे १ महिन्याचा कालावधी अपेक्षित आहे. परंतू योजना मार्च २०१३ अखेर पूर्ण करणेची असलेने सद्यस्थितीत अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना फेज-२ योजनेवरील शिल्लक असलेले ३५० व ३०० मी.मी. व्यासाचे पाईप तात्पुरत्या स्वरूपात केडगाव योजनेसाठी हस्तांतरीत करून घेणे व पाईप मनपास पुरवठा झालेनंतर परत अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना फेज-२ योजनेसाठी देणेस व तद्नुसार मे. तापी प्रिस्ट्रेस प्रोडक्ट JV यांना पत्र देणेस

३] **अ** व **ब** मधील नमूद पाईप परिमाण, पाईप उत्पादक व यापूर्वीचे पुरवठादार मे. जिंदाल सॉ. लि. यांचेकडून नव्याने पुरक करारनामा करून त्यानुसार पुरवठा आदेश देवून खरेदी करणेस

४] मे. जिंदाल सॉ. लि. यांचे विनंती पत्रानुसार यापूर्वीची सादर केलेली ICICI बँकेची, बँक गँरटी, मुदत संपल्याने परत करणेस व त्यांचेकडून दि.३०/०६/२०१३ पर्यत वैध असलेली बँक गँरटी नव्याने घेणेस

५] मे. जिंदाल सॉ. लि. यांचे अपेक्षित विनंतीनुसार त्यांना पुरवठा आदेशाच्या रक्कमे ऐवढी बँक गँरटी देणेस व त्याची कार्यवाही लेखा विभागामार्फत होणेस

६] पुरवठा आदेशानुसार मा. जिल्हाधिकारी , अहमदनगर यांचेकडे अबकारी करातून सूट मिळणे बाबतचा प्रस्ताव विहीत नमुन्यात सादर करणेस

७] वर्कींग सर्व्हेनुसार काम करणेबाबत ठेकेदार मे. एस.एन. एन्टरप्रायजेस व मे. अे.सी. कोठारी यांना कळविणेस

ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

येणेप्रमाणे शाखा अभियंता, पा.पु.विभाग यांचा अहवाल असे.

यावर मा. उपअभियंता (पा.पु.) यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत अहवालानुसार रू.१८२७१७००/- चे पाईप खरेदीस तसेच रूपये ५८००७७९/- च्या जादा खर्चास मान्यतेस्तव मा.स्थायी समिती यांचेकडे पाठविणे उचित होईल व त्यानुसार बाब क्र.१ ते ७ मंजूरीस्तव सादर.

यावर पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, केडगाव प्रभागासाठी मंजूर प्रकल्पा व्यतिरिक्त सर्व्हिस लाईन टाकणे व विस्तारित भागासाठी पाईप लाईन टाकणे गरजेचे असून यासाठी याभागात पाईप लाईन टाकणेस व त्यासाठी पाईप्स खरेदी करणेस मंजुरीस्तव सादर.

तसेच सदर पाईपच्या खरेदीस येणारे खर्च रूपये १,८२,७१,७००/-च्या खर्चास व पाईप खरेदी करणेच्या प्रक्रियेसाठी अहवालात नमूद १ ते ७ बाबींच्या मंजूरीसाठी सादर प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेसाठी पाठविणेस सादर.

यावर अंतर्गत लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, मॅकेनिकल इंजिनिअर (यंत्र अभियंता) यांनी केलेल्या शिफारसीप्रमाणे तद्वतच अर्थ विभागाने सन २०१२-२०१३ चे सुधारित अंदाजपत्रकाचे नवीन बुक लेट पृष्ठ क्र.९५ प्रमाणे यु.आय.डी.एस.एस.एम.टी. केडगांव पाणी पुरवठा योजनेसाठी मनपा हिस्सा दोन कोटी दर्शविल्या आहे. त्याप्रमाणे होणार जादा खर्च रू.५८००७७९/- ही रक्कम मनपा हिस्सा म्हणून वर्ग करण्याचे अधीन राहून रूपये १,८२,७१,७००/-चे पाईप खरेदीस मा.स्थायी समितीचे मान्यतेस्तव सादर.

यावर मुख्य लेखा अधिकारी यांचा अभिप्राय की, प्रस्तावाप्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर उपायुक्त (सा /कर) यांचा अभिप्राय की, अहवालानुसारचा प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे मंजुरीस्तव ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, प्रस्तावीत केलेनुसार मान्य.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- यु.आय.डी.एस.एस.एम.टी. केडगाव पाणी पुरवठा योजने अंतर्गत वर्कींग सर्व्हेनुसार वाढीव भागासाठी पाईप लाईन व सर्व्हिस लाईन टाकणेकामी जादा पाईप खरेदी करणेच्या वाढीव खर्चास मंजुरी मिळणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. सातपुते दि.ना. :- ऑफिस रिपोर्ट वाचण्यात यावा.

ऑफिस रिपोर्ट वाचण्यांत आला.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- कामे कोठे वाढली ते सांगा. किती पाईप टाकले.

मॅके.इंजि. श्री. निकम पी.जे. :- केडगाव यु.आय.डी.एस.एस.एम.टी. ची अंतर्गत काम चालू आहेत. त्या अंतर्गत मुळ प्रस्तावानुसार ७८ कि.मी. पाईप लाईन टाकायची आहे. वितरण व्यवस्थेसाठी ७६ कि.मी. लाईन टाकली आहे.पण नवीन भागासाठी प्रस्तावमध्ये पाईप धरले नव्हते. पण केडगावचा जो नवीन भाग वाढला त्या भागामध्ये वर्कींग सर्व्हेनुसार पाईप टाकणे गरजेचे आहे म्हणून वाढीव प्रस्ताव ठेवला.

मा.श्री.डागवाले कि.आ :-ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा

मा.श्री.कवडे उ.खं :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे यु.आय.डी.एस.एस.एम.टी. केडगाव पाणी पुरवठा योजने अंतर्गत वर्कींग सर्व्हेनुसार वाढीव भागासाठी पाईप लाईन व सर्व्हिस लाईन टाकणेकामी जादा पाईप खरेदी करणेच्या वाढीव रक्कम रूपये ५८,००,७७९/-(रूपये अठ्ठावन्न लाख सातशे एकोणऐंशी फक्त )खर्चास व कामास मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. डागवाले किशोर आसाराम सही /-

अनुमोदक :- मा.श्री. कवडे उमेश खंडेराव सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनग महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०१**

विषय क्रमांक- ७ सोमवार दिनांक ८/४/२०१३

ठराव क्रमांक - ७ सोमवार दिनांक ८/४/२०१३

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या जलशुध्दीकरण केंद्र विळद येथील जलशुध्दीकरण प्रक्रिये दरम्यान वाया जाणारे पाण्याचा पुर्नःवापर करणेकामी प्रकल्प राबविणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. शहर पाणी पुरवठा जा.क्र. ६११ दि.१६/२/२०१३

संदर्भ :- १. दि.१८/०१/२०१३ रोजी हुडको , मुंबई यांचेकडे समक्ष सादर केलेला प्रस्ताव

२. मा.क्षेत्रीय प्रमुख गृह आणि नागरी विकास महामंडळ मर्यादित , (हुडको) मुंबई यांचे क्र.४०८ दि.१ फेब्रुवारी २०१३ अन्वये मंजूरी बाबतचा प्राप्त फॅक्स

मा.सादर,

उपरोक्त विषयाबाबत विनंती रिपोर्ट सादर की, अहमदनगर महानगरपालिकेच्या शहर पाणी पुरवठा योजनेवरील जलशुध्दीकरण केंद्र, विळद येथील जलशुध्दीकरण प्रक्रीये अंतर्गत फिल्टर बेड वॉश केल्यानंतर वाया जाणारे पाणी व विळद, मुळानगर येथील इलेक्ट्रीक सप्लाय अचानक खंडीत झाल्यास विळद येथील साठवण टाक्या पूर्ण भरल्यानंतर ओव्हरफलो होउन वाया जाणारे पाणी उपयोगात आणणेसाठी तेथे असलेल्या महानगरपालिकेच्या मोकळया जागेत अंदाजे १० लाख लिटर्स क्षमतेची टाकी बांधून व त्यावर योग्य त्या क्षमतेचे इले. पंप बसवून पाईप लाईन द्वारे पाणी परत एरिएशन फौन्टनला सोडणे म्हणजे पाण्याचा पुर्नवापर करणेबाबतच्या कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले.

सदर अंदाजपत्रक तयार करतांना विळद पंपींग स्टेशन येथील मोकळया जागेत १० लाख लिटर्स क्षमतेचे संपवेल बांधणे, १५ अश्वशक्तीचे २ विदयुत मोटारी बसविणे, १० इंची डी.आय. / एम.एस. पाईप लाईन टाकणे इत्यादी कामाचा अंतर्भाव करून रूपये ५३,१८,३९७/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे.

अंदाजपत्रक / प्रस्ताव तयार करून अनुदान प्राप्ती साठी हुडको, मुंबई यांचेकडे दि.१८/०१/२०१३ रोजी समक्षात सादर केलेला होता.

या अनुषंगाने मा.क्षेत्रीय प्रमुख,गृह आणि नागरी विकास महामंडळ मर्यादित,(हुडको)मुंबई यांचा संदर्भिय फॅक्स इकडेस प्राप्त झालेला असून त्यामध्ये त्यांनी अहमदनगर महानगरपालिकेच्या विषयांकित प्रस्तावास व त्यासाठी अपेक्षित खर्च रक्कम रू.५३,१८,३९७/-चे अनुदानास मंजूरी देत असल्याचे व सदरचे अनुदान खालील अटीस अधीन राहून मंजूर करण्यात येत असलेबाबत कळविले आहे.

अहमदनगर महानगरपालिका मार्गदर्शक तत्वाचा अवलंब करून योजना मार्गी लावणेस व योजना मार्गी लावतांना अंदाजपत्रकीय रक्कम कमी जास्त झाल्यास त्यासही तयार आहोत अशा आशयाचा ठराव हुडको, मुंबई यांना स्वतंत्रपणे सादर करणे आवश्यक आहे.

यास्तव विषयांकित बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर निर्णयासाठी ठेवणे संयुक्तीक राहील. तथापी आपले आदेशार्थ ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

येणेप्रमाणे शाखा अभियंता पाणी पुरवठा विभाग यांचा अहवाल असे.

यावर पाणी पुरवठ विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, सदर बाबत मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, Put up theargh cafo

यावर मुख्य लेखाधिकारी यांचा अभिप्राय की, सदरचा प्रस्ताव मान्यतेसाठी मा.स्थायी समितीसमोर ठेवणे उचित वाटते मान्यतेस्तव सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, अहवालानुसारचा प्रस्ताव मान्यतेसाठी मा.स्थायी समितीपुढे ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर आयुक्त साहेब यांची अभिप्राय की , मान्य दि.२/०३/२०१३

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- जलशुध्दीकरण केंद्र विळद येथील जलशुध्दीकरण प्रक्रिये दरम्यान वाया जाणारे पाण्याचा पुर्नःवापर करणेकामी प्रकल्प राबविणेस मंजूरी मिळणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री.कवडे उ.खं. :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. डागवाले कि.आ.:- काय काम करणार.

मॅके.इंजि.श्री. निकम :-आपल्याकडे जलशुध्दीकरण केंद्रामध्ये जे फिल्टर असतात. त्या फिल्टरचे पाणी तसेच सोडतो तेथे टाकी बनवून व पंप जोडून अेरीशन फाउंटन पंपावरआणणार व ते पुन्हा वापरणार.प्रक्रिया करून त्या पाण्याचा वापर आपण करू शकतो. हुडको फंडीग करणार आहे अंदाजे ५३लाख रूपये खर्च येईल.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- पाणी खराब असते का ?

मॅके.इंजि. श्री. निकम पी.जे. :- खराब नसते.

मा.सौ. गंधे सु.मो. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. कवडे उ.खं. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- हुडको अर्थसहाय्य असल्याने ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या जलशुध्दीकरण केंद्र विळद येथील जलशुध्दीकरण प्रक्रिये दरम्यान वाया जाणारे पाण्याचा पुर्नःवापर करणेकामी प्रकल्प राबविणेस मंजूरी देण्यांत येत आहे. तसेच मार्गदर्शक तत्वाचा अवलंब करून योजना मार्गी लावणेस व योजना मार्गी लावतांना अंदाजपत्रकीय रक्कम जास्त झाल्यास ती रक्कम महानगरपालिका खर्च करणेस तयार आहे ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ. गंधे सुमन मोहनीराज सही /-

अनुमोदक :- मा.श्री. कवडे उमेश खंडेराव. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०१**

विषय क्रमांक- ८ सोमवार दिनांक ८/४/२०१३

ठराव क्रमांक - ८ सोमवार दिनांक ८/४/२०१३

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये GISसंगणक प्रणाली विकसित करणेकामी तीन आर्थिक वर्षात (सन२०१२-१३, २०१३-१४,२०१४-१५) येणा-या खर्चास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. संगणक विभाग दिनांक /०२/२०१३

उपरोक्त विषयास अनुसरून विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की, अहमदनगर महानगरपालिके मध्ये आज अखेर साधारण ८८००० मालमत्ता नोंदविण्यात आलेले असुन सन २००४-०५ नंतर अद्यापपर्यत फेर मुल्यांकनाचे काम झालेले नाही. सदर फेर मुल्यांकनासाठी तसेच बांधकाम , रस्ते, इलेक्ट्रीक पोल, टी.पी. स्क्रीम, सॅनिटेशन, कचरा कुंडया इ. विविध महानगरपालिकेच्या महत्वाच्या कार्यक्रमांसाठी GIS संगणक प्रणालीचा वापर करून सर्व माहिती एकत्रित करून ती NRSC हैद्राबाद या संस्थेकडुन खरेदी केलेल्या Image File वर टाकणे गरजेचे आहे.

GIS तंत्रज्ञानाद्वारे महानगरपालिकेच्या संपुर्ण हद्दीची उपग्रहाद्वारे प्रतिमा घेवुन विविध प्रकारचे सर्व्हे करून त्या सर्व्हेनुसार तयार झालेली माहिती GIS तंत्रज्ञानामध्ये टाकुन त्या नंतर आवश्यक असणारे सर्व अहवाल तयार करता येतात. त्यानंतर साधारण प्रत्येक वर्षी किंवा दोन वर्षानंतर पुन्हा उपग्रहाद्वारे नवीन प्रतिमा घेवुन अगोदरच्या प्रतिमे मधील व नंतरच्या प्रतिमे मधील फरक अथवा तफावत इ. माहिती मिळु शकते त्यामुळे महानगरपालिकेस देय असलेला कर लक्षात येवु शकतो. त्यामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये भर पडू शकते.

GIS तंत्रज्ञानाद्वारे महानगरपालिकेचे प्रामुख्याने मालमत्ता विभाग , कर विभाग , पाणी पुरवठा विभाग, आरोग्य विभाग, ड्रेनेज , बांधकाम, नगररचना, इलेक्ट्रीक विभाग, प्रभाग समिती कार्यालय इ. विविध विभागांची माहिती कायम अद्यावत ठेवता येते. त्याचा कार्यालयीन कामकाजा बरोबरच नागरिकांना देखील उपयोग होतो तसेच मा.केंद्र शासनाच्या UIDSSMT अभियाना अंतर्गत सुचविलेल्या सुधारणामध्ये महानगरपालिका / नगरपालिका यांना GIS संगणक प्रणाली विकसित करावी, या कामाचा अनिवार्य सुधारणामध्ये समावेश केलेला आहे. त्याचप्रमाणे मा. केंद्र शासनाच्या UIDSSMT योजने अंतर्गत प्रगतीपथावरील , मंजुरी प्राप्त व प्रस्तावीत योजना राबविणे अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिका GIS संगणक प्रणाली विकसित करणे आवश्यक व क्रमप्राप्त आहे.

या प्रस्तावा संबंधी सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेत खर्चाबाबत चौकशी केली असता त्यांनी Science & Technology Park ,पुणे विद्यापीठ यांच्याकडुन मिळविलेल्या माहितीनुसार अंदाजे रक्कम रू. २.०० कोटी खर्च असल्याचे सांगितले.

सदर GIS सिस्टीम तयार करणे बाबत सन २०१२-२०१३ च्या सुधारित अंदाजपत्रकामध्ये मालमत्ताकर वसुली विभागामध्ये मालमत्ता पुर्नमुल्यांकन खर्च या लेखाशिर्षाखाली रू.५०.०० (रू. पन्नास लाख) लाखाची तरतूद करण्यात आलेली असून सन २०१३-२०१४ च्या मूळ अर्थसंकल्पात सामान्य प्रशासन विभागामध्ये GIS सिस्टीम लेखाशिर्षाखाली रू. ८०.०० (ऐंशी लाख) लाखाची तरतूद करण्यात आलेली आहे.

GIS संगणक प्रणाली विकसित करणेकामी २.०० कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च हा एका वर्षात न करता तीन आर्थिक वर्षात (सन २०१२-१३, २०१३-१४, २०१४-१५) करण्यात येणार आहे. त्यामुळे GIS संगणक प्रणाली तयार करणेसाठी येणारा खर्च रू.२.०० कोटी व कामास मंजुरी मिळणेकामी मा.स्थायी समितीकडे सदरचा प्रस्ताव ठेवणेकामी आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे नोडल अधिकारी तथा सिस्टीम मॅनेजर यांचा अहवाल असे.

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, सन २०१२-१३ या आर्थिक वर्षातील तरतुद खर्चास मान्यता यावर्षी घेउन प्रत्येक वर्षी तरतुद करून, प्रत्येक वर्षात खर्चास मान्यता घेण्याचे अटीवर प्रस्ताव मान्यतेस्तव सादर. /**अ**

यावर मुख्य लेखा अधिकारी यांचा अभिप्राय की, **"अ"** प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर उपायुक्त (सा / कर) यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत **"अ"** प्रमाणे सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिति पुढे ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, **"अ"** नुसार मान्य

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेचे GISसंगणक प्रणाली विकसित करणेकामी तीन आर्थिक वर्षात येणा-या खर्चास मंजूरी मिळणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री.डागवाले कि.आ. :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. कवडे उ.खं. :- या प्रणालीची माहिती सांगा.

संगणक विभाग प्रमुख श्री.साळी :- GIS संगणक प्रणाली विकसित करणेकामी मा. शासनाने सक्तीच केले आहे. इमेज फाईल सरकारकडून खरेदी करून संपूर्ण शहराच सर्व्हे करून मॅपींग करून डिजिटायझ ेशन होईल.९० हजार प्रॉपर्टी आहे. प्रत्येक घराच डिटेल, नळकनेशन किती रोड किती आहे. ओपन प्लॉट आहे. डिटेल सर्व्हे होउन नेटवर सगळे बघता येईल.तसेच घरपट्टी व पाणीपट्टी च्या उत्पन्नात निश्चित वाढ होईल.

मा.सौ. खरमाळे सं. र. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- उत्पन्नात वाढ होणार असल्याने ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**<u>ठराव :-</u>**अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये GISसंगणक प्रणाली विकसित करणेकामी तीन आर्थिक वर्षात (सन२०१२-१३, २०१३-१४,२०१४-१५) येणा-या अंदाजे रूपये २,००,००,०००/-(रूपये दोन कोटी फक्त) खर्चास व कामास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ. खरमाळे संगाीता रत्नाकर सही /-

अनुमोदक :- मा.श्री. डागवाले किशोर आसाराम सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०१**

विषय क्रमांक- ९ सोमवार दिनांक ८/४/२०१३

ठराव क्रमांक - ९ सोमवार दिनांक ८/४/२०१३

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या शहर हद्दीतील स्थावर मिळकतीस नोंदीसाठी नियुक्त केलेल्या पथकास दिनांक ०१/०३/२०१३ पासून पुढील सहामहिन्याकरिता मुदतवाढ देणेस व नेमणूक देणेस व त्याकामीचे रूपये रू.२,९६,०००/- मानधन रकमेचे खर्चास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. नगररचना विभाग दि. /२/२०१३

संदर्भ - पथक प्रमुख स्थावर मिळकत व्यवस्थापन यांचा दिनांक १५/२/२०१३ चा अर्ज .

अहमदनगर शहर हददीतील स्थावर मिळकतीस महानगरपालिकेच्या नांवाच्या नोंदी करणे साठी निवृत्त तहसिलदार /नायब तहसिलदार /भूकरमापक यांचें पथकांची निवीदा मंजूर करुन नियुक्ती करणेत आलेली आहे. स्थायी समीती ठराव क्रमांक ३३दिनांक १४/०८/२०१२ अन्वये त्यांचे कामाची ६ महिन्या करीता मुदत वाढ देणेत आलेली होती. आता सदरची मुदत दिनांक २८/०२/२०१३ रोजी संपुष्टात येत आहे.पुढील सहा महिने करिता मुदत वाढीचा अर्ज दिलेला असुन पुर्वीचे मंजुर दराने काम करणेस तयार असलेचे उपरोक्त सदर्भाकित अर्जात नमुद केले आहे .पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या व करावयाच्या कामाची माहिती सोबत जोडलेली आहे.

**केलेले काम --**

१.पालिकेच्या मालकीच्या खुल्या जागा ,इमारती मैदांने ,बगीचे, कार्यालये शाळा दवाखाणे इत्यादी अशा प्रकारच्या एकूण **१४३३** जागा व **१२६३** रस्त्याच्या मिळकती आहेत. त्या पैकी आता पर्यन्त **८८२** जागेस व **८३९** रस्त्याचे मिळकतीस महानगरपालिकेच्या नांवाचे नोंदी लावणेचे काम झालेले आहे.

**२.** नोंदी झालेल्या वरील मिळकती पैकी रेखांकनातील क्षेत्र,फेरफार, ७/१२ प्रमाणे **३०७** मिळक्तीची तपासणी केलेली आहे. त्यामध्ये **१३०** मध्ये तफावत आढळून आल्याने सदरची प्रकरणे दुरुस्ती साठी कामगार तलाठी यांचे कडे पाठविलेली आहेत.

**३.** बांधकाम , अतिक्रमण , पाणि पुरवठा, नगर रचना या विभागा कडून आता पर्यत मोजणी साठी एकूण १२३८ प्राप्त झालेल्या प्रकरणातील मिळकतीची पथकातील भूकरमापक यांनी मोजणी करुन जागेवर हदी निशाण्या दाखवून दिलेल्या आहेत व त्या प्रमाणे नकाशासह संबंधित विभागास माहिती दिलेली आहे.

**शिल्लक करावयाचे कामाची माहिती --**

| अ. नं | मिळकतीचा तपशील | मिळकतीची संख्या | क्षेत्र एकर | करावयाची कार्यवाही |
|---|---|---|---|---|
| १ | मिळकत पत्रीका व सुचि क्रमांक -२ प्रमाण नोंदी करावयाचे मिळकती | **२२६** | | मिळकत पत्रीका व ७/१२ प्राप्त करुन घेवून तहसिलदार व नगर भूमापन अधिकारी यांचे कडे प्रस्ताव पाठविणे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | सन १९९५ पुर्वीचे मंजूर रेखांकनातील जागा | खुल्या जागा **२३१** रस्ते **२१५** | | मुळ मालकाकडून ताबे पावती,पंचनामा ताबेपावती करुन घेणे व प्रस्ताव तहसीलदार यांचे कडेस पाठविणे |
| ३ | नगर रचना योजना क्र.३ व ४ अंतीम भूखंड मंजूररेखांकनातील जागा | खुल्या **९४** रस्ते **१०१** | | रेखंकनातील खुल्या /रस्ते मुळ मालकाचे नांवाने आहेत. यातील १०मिळकतीच्या पंचनामा ताबेपावती करुन प्रकरणे नगर भूमापन अधिकारी यांचे कडेस पाठविलेली होती.त्यांनी नोंदणीकृत दस्तऐवज व हक्कसोडपत्रकाची मागणी केलेली आहे परंतु यातील बरीचशी प्रकरणे साधारण सन१९६५-६६पुर्वीचे आहेत त्यातील काही मुळ मालक मयत झालेने, वारस टाळाटाळ करीत असल्याने पत्यावर अढळ होत नसल्याने सदयस्थितीत त्यांचे कडून नाममात्र नोंदणीकृत दस्त ऐवज तयार करुन घेणे शक्य होत नाही म्हणून ताबे पावती / पंचनामा ताबे पावती वरुन नोंदी करणे बाबतचे आदेश मा.जमाबंदी आयुक्त आ.संचालक भूमि अभिलेख पुणे यांचे कडून मागविणेत आलेले आहेत. त्यांचे कडील आदेशा प्रमाणे पुढील कार्यवाही करावी लागणार आहे. |
| ४ | नगर रचना योजना क्र.४ मधील आरक्षीत भूखंड क्रमांक १११ बाबत | **१** | **६ एकर** | मा.उप संचालक भूमि अभिलेख,नासिक प्रदेश नासिक यांनी अपील अंशता मान्य करुन प्रकरण नगर भूमापन अधिकारी यांचे कडेस फेर चौकशी साठी पाठविलेले आहे. यात त्यांचे कडील आदेशा प्रमाणे पुढील कार्यवाही करणे |
| ५ | नगर रचना योजना क्र.४ मधील आरक्षीत भूखंड क्रमांक १९३ व १९५ बाबत | **२** | **१२ एकर** | या बाबत मा. उप संचालक भूमि अभिलेख नासिक यांचे कडे अपील केलेले आहे.अपील प्रलंबित असून आदेशा प्रमाणे पुढील कार्यवाही करणे |
| ६ | सिटी सर्व्हे नंबर ४७७०-अ मधील जागा | **७** | **९ एकर** | मा.उप संचालक भूमि अभिलेख नासिक यानी अपील अंशता मान्य करुन प्रकरण महाराष्ट जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २०[२] प्रमाणे चौकशी साठी नगर भूमापन अधिकारी अहमदनगर यांचे कडेस पाठविले आहे. त्यांचे आदेशा प्रमाणे पुढील कार्यवाही करावी लागणार आहे. |
| ७ | मौजे-विळद येथील जलशुधीकरण केंद्रसाठी संपादन केलेली जागा | **१** | **१५ एकर** | या मिळकतीस अदयाप मुळ मालकांची नांवे आहेत. संपादन निवाडा,जूना७/१२ फेरफार,ताबे पावती, इत्यादी कागदपत्र उपलब्ध करुन घेवून त्या प्रमाणे नोंद करणेबाबतचा प्रस्ताव तहसिलदार यांचेकडेस पाठविणे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | चाहूराणा वाकोडी भूयारी डेनेज साठी सपादन केलेले क्षेत्र | **१** | **१६ एकर** | या मिळकतीस ७/१२ ला अदयाप मुळ मालकांची नांवे आहेत . संपादनाचे अवार्ड जुने ७/१२ फेरफारच्या नकला घेणे व प्रत्यक्ष जागेची मोजणी करण.जिवन प्राधिकरणाकडुन ताबे पावती करून घेणे इ कार्यवाही झालेनंतर नोंद करणेचा प्रस्ताव तहसिलदार यांचेकडे सादर करणे . |
| ९ | पिंपळगांवमाळवी तलावासाठी संपादन केलेले क्षेत्र | **१** | **७०० एकर** | नोंदीसाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी याचेकडे पाठविलेला आहे . त्याचेंकडील आदेश प्राप्त झालेनंतर मा जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख व तहसिलदार अहमदनगर याचेकडे नवीन ७/१२ तयार करून घेणे बाबत पत्रव्यवहार व पाठपुरावा करणे आवश्यक आहे . |
| १० | सावेडी गांवठाण व लगतचे क्षेत्रास सीटी सर्व्हे लागू करणे बाबत | **५००** | | सीटी सर्व्हे लागू करणचे खर्चाची रक्कम १७ लाख मंजुर करणेत आली आहे .नगर भूमापन अधिकारी अहमदनगर यांचेकडे रक्कम जमा करून सिटी सर्व्हे लागू करणच कामा बाबत पुढील कार्यवाही करावी लागणार आहे . |
| ११ | मुकुंदनगर,दर्गा दायरा,फकिरवाडा येथील क्षेत्राचे सिटी सर्व्हे लागू करणे | **५००० ते ६०००** | | या बाबत मिळकतीचे उतारे काढणे व माहिती घेवून सिटी सर्व्हे लागू करणे बाबतचा प्रस्ताव सादर करणे |
| १२ | महानगरपालिकेच्या नांवाने नोंदी झालेल्या मिळकतीची फेर तपासणी | खुल्या **८८२** रस्ते **८३९** | | महानगरपालिकेच्या नांवाने झालेल्या सर्व मिळकतीची मंजूर रेखांकन, मुळ ७/१२ , मिळकत पत्रिका , वरील क्षेत्राचा ताळमेळ घेणे तफावत असल्यास दुरुस्तीची कार्यवाही करावी लागेल |
| १३ | मोजणी कामा बाबत | | | नोंदी झालेल्या खुल्या जागेची प्रत्यक्ष मोजणी करणे क्षेत्रात तफावत अथवा अतिक्रमण आढळून आल्यास कार्यवाही करावी लागेल. |
| १३ | व्दिनोंद पध्दती नुसार नमुना"क"-३८ [नियम क्र.६२, १९१] जमिनीची नोंद वही | | | नोंदीचे काम पुर्ण झाल्यावर त्यांचे ७/१२ फेरफार मिळकत पत्रीका यांचे उतारे घेवुन एकूण **१४३३** खुल्याजागा व रस्ते **१२६३** असे एकूण **२६९६** मिळकतीच्या व्दिनोंद पध्दतीचे नोंदवहीत नोंदी करणे व प्रत्येक मिळकतीची माहिती संगणीकृत करणे अवश्यक आहे. |

हल्ली कार्यरत असलेले पथकातील अधिकारी / कर्मचारी यांनी नियमीत्त पणे चांगल्या प्रकारे काम केलेले आहे. नोंदी साठी अवश्यक ते उतारे, जुने कागदपत्राचा शोध घेवून त्या प्रमाणे पुढील कार्यवाही साठी प्रस्ताव संबंधित खात्या कडे पाठविला जातो हे काम दुस-या खात्यावरा अवलंबून असल्याने काही वेळेस विलंब होत आहे. त्याबाबत वेळो वेळी संबंधित खात्याकडे समक्ष व पत्र व्यवहारानी पाठपूरावा पथका मार्फत केला जात आहे.

तसेच अतिक्रमण काढणे व रस्त्याचे कामासाठी मोजणी करुन हददी निशाण्या निश्चित करणे साठी पालिकेकडे तांत्रीक कर्मचारी नसल्याने मोजणीचे काम पथकातील सर्व्हेअर यांचे कडून करुन घेतली जातात या कामा साठी त्यांचे सेवेची तातडीने नेहमी गरज भासते.

महानगरपालिकेच्या नोंदी च्या कामाची पथकातील अधिकारी कर्मचारी यांना चांगल्या प्रकारे माहिती झालेली आहे. ते पुढील कालावधी साठी पुवीर्चे मंजूर दराने काम करणेस तयार आहेत. त्या मुळे प्रस्तावात नमुद केलेली शिल्ल्क कामे बिनचुक एक सुत्रीपणे पूर्ण करण्याचे दृष्टीने स्थावर मिळकत व्यवस्थापन पथकास दिनांक १/३/२०१३ पासुन सहा महिन्याच्या कालावधी करीता मुदत वाढ देणे व त्यासाठी सहा महिन्या करिता निवेदीतील मंजूर दराची रुपये २.९६[लाख] येणा-या खर्चाला मान्यता मिळणे साठी प्रस्ताव स्थायी समिती कडे सादर करणेस हरकत नाही. **/अ**

येणेप्रमाणे नगरररचनाकार यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की, Put up Regular Auditer /Cafo

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, **"अ"** प्रमाणे मान्यतेस सादर.

यावर मुख्य लेखा अधिकारी यांचा अभिप्राय की, **"अ"** प्रमाणे कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (सा./कर) यांचा अभिप्राय की, अहवालानुसार सदरचा प्रस्ताव निर्णयास्तव मा.स्थायी समिती पुढे ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, मान्य दि.१५/०३/२०१३

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :-स्थावर मिळकतीस नोंदीसाठी नियुक्त केलेल्या पथकास पुढील सहामहिन्याकरिता मुदतवाढ देणेस ,नेमणूक देणेस व मानधन रकमेचे खर्चास मंजूरी मिळणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. शेख आरिफ शे.र. :- ऑफिस रिपोर्ट वाचण्यांत यावा.

ऑफिस रिपोर्ट वाचण्यांत आला.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- हे पथक काय काम करते.

नगररचनाकार श्री. दहे :- महानगरपालिकेचे रस्ते, ओपन स्पेस नामांतर करून मनपाच्या नावावर करण्याचे काम हे पथक करते. त्यांचे काम चांगले आहे. महानगरपालिकेचा जागेची मोजणी ही करून देत असातात. ६ महिने मुदतवाढ प्रस्ताव दिला आहे

मा.श्री.सातपुते दि.ना. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. शेख आरिफ शे.र. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेच्या शहर हद्दीतील स्थावर मिळकतीस नोंदीसाठी नियुक्त केलेल्या पथकास दिनांक ०१/०३/२०१३ पासून पुढील सहामहिन्याकरिता मुदतवाढ देणेस व नेमणूक देणेस व त्याकामीचे रूपये रू.२,९६,०००/- (रूपये दोन लाख शहाण्णव हजार फकत) या मानधन रकमेचे खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर. नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.सातपुते दिलीप नानाभाउ सही /-

अनुमोदक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०१**

विषय क्रमांक- १० सोमवार दिनांक ८/४/२०१३

ठराव क्रमांक - १० सोमवार दिनांक ८/४/२०१३

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेची अमरधाम गेट जवळ एम.एस.ई.बी. इलेक्ट्रीक डी.पी. जवळील ४x६ फुट या मोजमापाची खुली जागा अर्जदार श्री. अनिल सुरेशराव वाघ , रा. नालेगांव ,अ.नगर यांना तात्पुरत्या स्वरूपात १ वर्षासाठी दरमहा भाडे रूपये ५५०/- व अनामत रक्कम रूपये ३०,०००/- घेवुन मोकळी जागा दरमहा भाडे तत्वावर देणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. मार्केट विभगा दि.१३/३/२०१३

संदर्भ - जा.क्र. टि.पी. ५१६७ दि.११/३/२०१३ चे पत्र

सादर,

उपरोक्त संदर्भाधिन विषयास अनुसरून विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की, अर्जदार यांनी मागणी केलेल्या जागेबाबत संदर्भिय पत्र देवून मा. नगररचनाकार यांनी खालील प्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

अर्जदार यांना पानरपदीसाठी अमरधाम गेट जवळ शेजारी ४ फुट x ६ फुट जा १४० चौ. फुट म्हणजेच १३.०१ चौ.मी. x सरकारी दर रू.४०००/- प्रती चौ.मी. ५२०४०/- सदर मुल्यावर महानगरपालिकेस साधारणपणे १२% इतके वार्षिक उत्पन्न मिळणे आवश्यक आहे. वार्षिक उत्पन्न = ५२०४०x१२% = ६२४५/- म्हणजेचे दरमहा भाडे रू.५२०/- इतके येते. सबब अर्जदार यांना दरमहा रू.५५०/- इतके भाडे १ वर्षाच कालावधीसाठी आकरणे योग्य होईल.तसेच जमिन मुल्याच्या ५०% इतके डिपॉझीट म्हणजेच साधारणपणे रू.३०,०००/- इतके डिपॉझीट घेणे योग्य होईल.वरीलप्रमाणे भाडे आकारणी करून १ वर्षाच्या तात्पुरत्या कालावधीसाठी देणेस हरकत नाही असे कळविले आहे.

तथापि सदर प्रकरणी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७९ मधील तरतुदी पाहाता सदर प्रकरण मान्यतेसाठी मा.स्थायी समिती पुढे सादर करणे योग्य होईल.सबब आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे मार्केट विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मुख्यलेखपरिक्षक यांचा अभिप्राय की,नगररचनाकार यांचे अभिप्रायाप्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, सादर, मार्केट विभाग प्रमुख तसेच नगररचनांकार यांचे अहवालानुसार सदरचा विषय मा.स्थायी समिती समोर निर्णयार्थ तथा आदेशार्थ सादर करणे उचित सबब आदेशार्थ .

यावर आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक सही दि.१८/३/२०१३

--००--

दिनांक ४/०४/२०१३

विषय- अमरधाम गेट जवळ आंबेकर जनरल स्टोअर्स शेजारी ५ फुट + ५ फुटची जागा भाडे तत्वावर मिळणे बाबतच्या प्रस्तावात दुरूस्ती करणेबाबत.

संदर्भ :- १. श्री. अनिल सुरेशराव वाघ याचा दि.७/१/२०१३ रोजीचा अर्ज

२. जा.क्र. टि.पी. ५१६७ दि.११/३/२०१३ अन्वये पाठविलेला अहवाल

उपरोक्त विषयान्वये अहवाल सादर करण्यात येतो की, श्री. वाघ यांनी अमरधाम गेट जवळ शेजारी ५ फुट+ ५ फुट ची जागा भाडे तत्वावर मिळणे बाबत .संदर्भिय अर्जान्वये विनंती केलेली होती व त्या अनुषंगाने अर्जदार व मार्केट विभागाचे श्री. माने यांच्या समवेत जागा पाहणी करून अर्जदार यांनी दाखविलेली जागा मार्केट विभागाने अद्याप भाडेतत्वावर दिलेली नसल्याने या विभागाने भाडे निश्चिती अहवाल संदर्भिय पत्र क्र.२ अन्वये मार्केट विभागास पाठविलेला आहे व त्या अनुषंगाने मार्केट विभागाने सदर प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे सादर केलेला आहे.

परंतु या विभागाने पाठविलेल्या भाडे निश्चिती अहवालात कॉपी पेस्ट करताना नजरचुकीने सदर जागेचे क्षेत्र ४ फुट x ६ फुट म्हणजेच २४.०० चौ. फुट ऐवजी चुकुन १४०.०० चौ. फुट इतके दर्शविण्यात आलेले आहे व त्यानुसार भाडे आकारणी करण्यांत आलेली आहे. सदर चुक दुरूस्त करून खालील प्रमाणे भाडे आकारणी करून सदर जागा भाडे तत्वावर देणे आवश्यक आहे.

विषयांकित जागी ४x६ फुट इतकी खुली जागा उपलब्ध असुन सदर जागेचा भाडे निश्चिती अहवाल खालीलप्रमाणे--

१ ] खुल्या जमिनीचे क्षेत्र-२४.०० चौ. फुट म्हणजेच २.२३ चौ.मी.

२] सन २०१३ प्रमाणे सदर जागेचा सरकारी दर रू.४६००/- प्रती चौ.मी. इतका आहे.

३] जमिनीचे मुल्य = २.२३ चौ.मी. x ४६०० = रू.१०२५८/- सदर मुल्यावर महानगरपालिकेस साधारणपणे १२% इतके वार्षिक उत्पन्न मिळणे आवश्यक आहे.

वार्षिक उत्पन्न =१०२५८ x १२% =१२३०.९६ म्हणजेच दरमहा भाडे रू.१०३- इतके येते सबब अर्जदार यांना दरमहा रू.१५०/- इतके भाडे आकारणे १वर्षाच्या कालावधीसाठी आकारणे योग्य होईल.

तसेच जमिन मुल्याच्या ५०% इतके डिपॉझीट म्हणजेच साधारणपणे रू.६०००/- इतके डिपॉझीट घेणे योग्य होईल.

उपरोक्त प्रमाणे भाडे अहवालात दुरूस्ती करून त्याप्रमाणे पुढील कार्यवाहीसाठी प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे सादर करणे योग्य होईल.

येणेप्रमाणे नगररचनाकार यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा -**

मा.सभापती साहेब :- अमरधाम गेट जवळ एम.एस.ई.बी. इलेक्ट्रीक डी.पी. जवळील ४x६ फुट या मोजमापाची खुली जागा अर्जदार श्री. अनिल सुरेशराव वाघ , रा. नालेगांव ,अ.नगर यांना तात्पुरत्या स्वरूपात १ वर्षासाठी दरमहा भाडे व अनामत रक्कम घेवुन मोकळी जागा दरमहा भाडे तत्वावर देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. कवडे उ.खं. :- ऑफिस रिपोर्ट वाचण्यात यावा.

ऑफिस रिपोर्ट वाचण्यांत आला.

नगररचनाकार श्री. दहे :- भाडेतत्वावर देताना ऑफिस रिपोर्टमध्ये टायपिंग चुकले होते. त्याच्या दुरूस्त रिपोर्ट आज सभेत देत आहे. त्यानुसार भाडे आकारले जाईल. रेडीनकेनर नुसार रू. १५०/- दरमहा भाडे व रू.६०००/- अनामत घेणे योग्य राहील तसे दुरूस्ती रिपोर्ट मध्ये नमूद केलेले आहे.

मा.श्री. कवडे उ.खं. :- दुरूस्ती रिपोर्ट मध्ये नमूद दरानुसार ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा

मा.श्री. डागवाले कि.आ. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- दुरूस्ती ऑफिस रिपोर्टमध्ये नमुद दरमहा भाडे व अनामत घेवून ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**ठराव :-** दुरूस्ती ऑफिस रिपोर्टानुसार अहमदनगर महानगरपालिकेची अमरधाम गेट जवळ एम.एस.ई.बी. इलेक्ट्रीक डी.पी. जवळील ४x६ फुट या मोजमापाची खुली जागा अर्जदार श्री. अनिल सुरेशराव वाघ , रा. नालेगांव ,अ.नगर यांना तात्पुरत्या स्वरूपात १ वर्षासाठी दरमहा भाडे रूपये १५०/- (रूपये एकशे पन्नास फक्त ) व अनामत रक्कम रूपये ६,०००/-(रूपये सहा हजार फक्त)घेवुन मोकळी जागा दरमहा भाडे तत्वावर देण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च
नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.कवडे उमेश खंडेराव. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. डागवाले किशोर आसाराम सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०१**

विषय क्रमांक- ११ सोमवार दिनांक ८/४/२०१३

ठराव क्रमांक - ११ सोमवार दिनांक ८/४/२०१३

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री यापदी श्री. प्रसाद मुरलीधर हातळवणे यांची अटी व शर्ती नुसार दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. आस्थापना जा.क्र./वर्क.२६९ दि.१९/३/२०१३

संदर्भ- १. श्री. प्रसाद मुरलीधर हातवळणे यांचा दिनांक २२/१/२०१३ व २३/१/२०१३ रोजीचे अर्ज

२. जा.क्र. शहर पा.पु. योजना १३६६ दिनांक १३/२/२०१३ रोजीचे पत्र.

सादर,

विनंती की, श्री. प्रसाद मुरलीधर हातवळणे यांचे विनंती अर्जाच्या अनुषंगाने मा.मॅके. इंजि. पा.पु. विभाग प्रमुख यांनी त्यांचे जा.क्र. शहर पाणी पुरवठा योजना १३६६ दि.१३/०२/२०१३ अन्वये इकडेस पत्र देवून त्यामध्ये संदर्भीय पारित ओदशानुसार अहमदनगर महानगरपालिकेमध्ये पाणी पुरवठा अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारानुसार खालील नमुद तांत्रिक हुद्दा प्रमाणे तात्पुरत्या स्वरूपात पदावर दि.२३/०८/२०१२ रोजी पासून ६ महिन्याकरिता निर्देशित अटी व शर्तीप्रमाणे मानधनावर करारबध्द नेमणूक केलेल्या कर्मचा-यांची मुदत दि.२३/०२/२०१३ रोजी पुर्वी संपुष्टात येणार आहे. त्याकरिता मुदतवाढ मिळणेबाबत दि.२२/१/१३ रोजी इकडेस विनंती अर्ज दिलेला आहे. सदर अर्ज आपले माहितीस व पुढील कार्यवाहीसाठी कळविण्यांत येत आहे. असे नमुद करून सुचित केलेले आहे.

पाणीपुरवठा अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री या पदांवर अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरिता दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती करीता थेट पध्दतीने उमेदवारांच्या दि.१७/७/१२ रोजी मुलाखती आयोजित करण्यांत येत असल्याबाबत दि.११/७/१२ रोजीच्या दैनिक सामना व नगर टाईम्स या वर्तमान पत्रामध्ये जाहिराती प्रसिध्दीस देण्यांत आलेल्या होत्या.

त्या अनुषंगाने दि.१७/७/१२ रोजी मा.आयुक्त तथा अध्यक्ष निवड समिती यांनी समक्ष सुचित केल्यानुसार मा.उप. आयुक्त तथा सदस्य सचिव व मा. निवडा समिती सदस्य यांनी उमेदवारांच्या थेट पध्दतीने मुलाखती घेवून पात्र ठरवून उमेदवारांची निवड केलेली होती.

त्यानुसार पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री यापदी अटी व शर्तीनुसार श्री. बाबासाहेब नामदेव बनकर यांची सहा महिन्याकरिता दरमहा रू. ६०००/- या मानधनावर पाणी पुरवठा विभागामध्ये जा.क्र.आस्था./ कंत्राटी करारबध्द नेमणूक २३५१ दि.२४/७/१२ अन्वये करारबध्द नियुक्ती बाबत आदेश निर्गमित करण्यांत आलेला होता.

तथापि श्री. बनकर बाबासाहेब नामदेव यांनी दि.६/८/१२ रोजी अर्ज देवून त्यामध्ये पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री या पदावर नियुक्ती झालेली होती. मला घरगुती कारणास्तव मी या पदासाठी नियुक्त होवू शकत नाही. मला माफ करावे असे नमुद करून विनंती केलेली होती.

तसेच हातवळणे प्रसाद मुरलीधर यांनी दि.९/८/१२ रोजी अर्ज देवून त्यामध्ये पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री या पदावर प्रतिक्षा यादीमध्ये नाव आलेले आहे. मला असे समजले आहे की ज्या व्यक्तीचे नावाची नेमणूक झाली होती ती व्यक्ती त्याचा काही घरगुती कारणास्तव नियुक्त होवू शकत नाही. तरी त्यांच्या जागी माझी नियुक्ती व्हावी. असे नमुद करून विनंती केलेली होती.

सदर तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री या एक पदासाठी दि.१७/७/२०१२ रोजी थेट पध्दतीने मुलाखती करीता दोन उमेदवार उपस्थित होते. त्यापैकी बनकर बाबासाहेब नामदेव यांची निवड होवून पात्र झालेले होते व प्रतिक्षा सुचीवर श्री. हातवळणे प्रसाद मुरलीधर यांचे नाव होते.

जा.क्र. आस्था. / कंत्राटी करारबध्द नेमणूक २३५१ दि.२४/७/१२ अन्वयेच्या आदेशानुसार श्री. बनकर बाबासाहेब नामदेव हे त्यांच्या विनंती अर्जानुसार सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द रूजू होवू शकणार नसल्याने जा.क्र. आस्था. कंत्राटी करारबध्द नेमणूक २८९६ दि.२३/८/१२ अन्वये पाणी पुरवठा अत्यावश्यक सेवेकरिता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री या पदी अटी व शर्ती प्रमाणे श्री. हातवळणे प्रसाद मुरलीधर यांची सहा महिनयाकरीता रू.६०००/- या दरमहा मानधनावर पाणी पुरवठा विभागामाध्ये करारबध्द नियुक्ती करण्यात आलेली आहे.

सदरच्या कालावधीतील मानधनावरील करारबध्द नियुक्तीची मुदत ही दि.२२/२/१३ रोजी समाप्त झालेली आहे.

तरी श्री. हातवळणे प्रसाद मुरलीधर यांचे उपरोक्त विनंती अर्जाच्या अनुषंगाने व मा. मॅकेनिकल इंजिनिअर पाणी पुरवठा विभाग यांचेकडील जा.क्र शहर पा.पु.योजना १३३६ दि.१३/२/१३ अन्वयेच्या पत्राच्या अनुषंगाने पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री यापदी अटी व शर्ती प्रमाणे श्री. हातवळणे प्रसाद मुरलीधर यांची तांत्रिक खंड देवून दिनांक १६/०३/२०१३ पासुन सहा महिन्याकरिता दरमहा रू.६०००/- या मानधनावर जा.क्र. आस्थापना / कंत्राटी करारबध्द ९८५४ दिनांक १४/०३/२०१३ अन्वये सदर केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे सविनय सादर.

येणे प्रमाणे आस्थापना प्रमुख / सहाय्यक आयुक्त यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री यापदी श्री. प्रसाद मुरलीधर हातळवणे यांची अटी व शर्ती नुसार दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.सौ.खरमाळे सं.र. :- कार्योत्तर मंजूरी असल्याने ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा

मा.श्री.सातपुते दि.ना. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- कार्योत्तर मंजूरी असल्याने ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**<u>ठराव :-</u>**अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री यापदी श्री. प्रसाद मुरलीधर हातळवणे यांची अटी व शर्ती नुसार दिनांक १६/०३/२०१३ पासुन सहा महिन्याकरिता दरमहा रू.६०००/- (रूपये सहा हजार फक्त) या मानधनावर केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ. खरमाळे संगीता रत्नाकर सही /-

अनुमोदक :- मा.श्री. सातपुते दिलीप नानाभाउ सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०१**

विषय क्रमांक- १२ सोमवार दिनांक ८/४/२०१३

ठराव क्रमांक - १२ सोमवार दिनांक ८/४/२०१३

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग समिती क्रमांक-४ चे कार्यक्षेत्रातील राणी लक्ष्मीबाई चौक, भुषणनगर केडगाव येथील मनपाची महिला जिम खाजगी तत्वावर चालविण्यांस देणेकामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट मंजूरीस्तव.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. सार्व.बांधकाम विभाग दि.८/३/२०१३

संदर्भ :- १. मा. महासभा ठराव क्र.१० दि.२५/६/२०१२

२. दि.८/३/२०१३ रोजीचे छाननी समितीचे इतिवृत्त

मा. सादर,

विनंती रिपोर्ट की, उपरोक्त बाबत माहिती खालीलप्रमाणे

१] प्रशासकीय मान्यता- मा. महासभा ठराव क्र.१० दि.२५/६/२०१३

२]कोरे निविदा फॉर्म विक्री कालावधी-दि.१५/१/१३स.११.००पासून ते दि.२२/१/१३दु.१६.०० वा.पर्यत

३] तांत्रिक व व्यापारी लिफाफा दाखल करणे- दि.१५/१/१३-११.००वा.पासून दि.२३/१/१३-१७.४५पर्यत

४] तांत्रिक व व्यापारी लिफाफा उघडणे-दि.२४/१/१३-११.००वा.पासून तेदि.२५/१/१३-१७.४५वा.पर्यत

५] प्रशासनाने निश्चित केलेली रक्कम- रू.२०००/- दरमहा

६] अनामत रक्कम- रू. १०,०००/- (रक्कम रू. दहा हजार मात्र)

सदर कामी दिलेल्या मुदतीमध्ये खाली नमूद केलेल्या महिला बचत गटांच्या एकुण ४ इतक्या सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या होत्या, सदरच्या सिलबंद निविदांचा तांत्रिक लिफाफा क्र.१ दि.८/३/२०१३ रोजी दु.४.०० वा. रोजीच्या छाननी समितीसमोर उघडण्यात आला, मा. छाननी समितीच्या शिफारशीनुसार मा.आयुक्त यांचे मान्यतेने तांत्रिक लिफाफा क्र.२ उघडण्यात आला. त्यामध्ये आलेले दर खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | महिला बचत गटाचे नाव | आलेला प्रतिमहा दर |
|---|---|---|
| १ | दिप महिला बचत गट, भूषणनगर, केडगाव | ५,००५/- |
| २ | कुलस्वामिनी महिला बचत गट भूषणनगर केडगाव | १६,०००/- |
| ३ | जयभ्रदा महिला बचत गट, भूषणनगर, केडगाव | ६१,०००/- |
| ४ | कल्याणी महिला बचत गट, केडगाव | २६,०००/- |

सदर दराचा तुलनात्मक तक्ता पाहता त्यामध्ये जयभद्रा महिला बचत गट, भूषणनगर , केडगाव यांचे आलेले प्रतिमहा दर रू.६१,०००/- (अक्षरी रक्कम रू.एकसष्ठ हजार मात्र) सर्वात जास्त आलेले आहेत.

तरी जयभद्रा महिला बचत गट, भूषणनगर, केडगाव यांचे आलेले दरास मान्यता मिळणेस्तव ऑफिस रिपोर्ट मा.स्थायी समितीकडेस पाठविणेस व मा.स्थायी समितीच्या मान्यतेनंतर नियमानुसार करारनामा करणे व दरमहा भाडे वसूलीची कार्यवाही व भाडेतत्वाचा करारनामा संपल्यानंतर पुनश्च निविदेची कार्यवाही करण्यासाठी मार्केट विभागामार्फत होणेस आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे प्रभाग अभियंता यांचा अहवाल असे.

यावर उपशहर अभियंता यांचा अभिप्राय की, अहवालान्वये मान्येतेस्तव सादर.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, अहवालानुयार मान्यतेस सादर.

यावर उपायुक्त सा यांचा अभिप्राय की, अहवालनुसार सदरचा प्रस्ताव मंजुरीस्तव मा.स्थायी समितीपुढे ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक सही दि.१६/३/२०१३

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- प्रभाग समिती क्रमांक-४ चे कार्यक्षेत्रातील राणी लक्ष्मीबाई चौक, भुषणनगर केडगाव येथील मनपाची महिला जिम खाजगी तत्वावर चालविण्यांस देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री.डागवाले कि.आ. :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

शहर अभियंता श्री. कुलकर्णी :- प्रशासनाने भाडे रूपये २०००/- प्रतिमाह ठरवलेले आहे. व अनामत रक्कम रूपये १००००/- भरावयाची आहे. जयभद्रा महिला बचत गटाने दरमहा रू.६१०००/- दर भरला आहे. दर जास्तीचा असल्याने मंजुरी मिळावी.

मा.सौ. गंधे सु. मो. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. कवडे उ. खं. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग समिती क्रमांक-४ चे कार्यक्षेत्रातील राणी लक्ष्मीबाई चौक, भुषणनगर केडगाव येथील महानगरपालिकेची महिला जिम खाजगी तत्वावर चालविण्यांस देणेकामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट पहाता मा.छाननी समितीने केलेल्या शिफारशीनुसार जास्तीचे निविदा धारक जयभद्रा महिला बचत गट, भूषणनगर , केडगाव यांना दरमहा भाडे रू.६१,०००/- (अक्षरी रक्कम रू.एकसष्ठ हजार मात्र) दराने देणेस मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर. नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ.गंधे सुमन मोहनीराज सही /-

अनुमोदक :- मा.श्री.कवडे उमेश खंडेराव. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-<br>
सभापती<br>
स्थायी समिती<br>
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०१**

विषय क्रमांक- १३ सोमवार दिनांक ८/४/२०१३

ठराव क्रमांक - १३ सोमवार दिनांक ८/४/२०१३

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह येथे तात्पुरत्या स्वरूपात बालरोग तज्ञ (ऑनरी डॉक्टर) यांची कंत्राटी करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे मानधनावरील करारबध्द नेमणुकीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. आस्थापना विभाग जा.क्र./वर्क . २७१ दि.२५/३/२०१३

संदर्भ :- प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी यांचेकडील जा.क्र. कै.बा.दे. दवा. व सुतिका गृह ९७६ दिनांक ९/१/२०१३ रोजीचा प्रस्ताव

विनंती सादर करण्यांत येतो की, प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी यांनी त्यांचेकडील जा.क्र. कै.बा.दे. दवा. व सुतिका गृह ९७६ दिनांक ९/१/२०१३ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये कै.बा.दे.दवा. व सुतिका गृह येथे बालरोग तज्ञ डॉक्टरांची आवश्यकता नेहमी भासते आस्थापना सुचीवर बालरोग तज्ञाचे पद मंजुर नसल्यामुळे बालरोग तज्ञ डॉक्टरांची (ऑनररी बालरोग तज्ञ म्हणून) मानधनावर नेमणूक करावी लागते कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह येथे मानद बालरोग तज्ञ म्हणून १] डॉ.श्री. अनिरूध्द गिते M.D. २] डॉ. सुचित तांबोळी M.B.B.S.D.C.H.P.G.D.M.L.S. यांची जा.क्र. आस्था. / कंत्राटी करार नेमणूक ४९८५ दिनांक २३/१०/२०१२ अन्वये दरमहा रू.१५००/- च्या मानधनावर दि.३०/६/२०१२ ते दि. २९/१२/२०१२ अखेर सहा महिन्याकरीता नेमणूक केलेली होती. सदरच्या नेमणूकीची मुदत दि.२९/१२/२०१२ रोजी संपली आहे. डॉ.श्री. अनिरूध्द गिते व डॉ.श्री. सुचित तांबोळी बालरोग तज्ञ यांनी त्यांची मुदत संपत आल्यामुळे कै.बा.दे.दवाखान्यामध्ये मानधनावर रूग्णांना वैद्यकीय सेवा देणेसाठी पुढील काळासाठी नेमणूक चालु ठेवणेबाबत विनंती अर्ज दिलेले आहेत. वरील बालरोग तज्ञ दवाखान्यातील नवजात अर्भकांची तपासणी करून औषधोपचार करतात. त्यामुळे दवाखान्यांत येणा-या गरीब व गरजु रूग्णांना त्याचा जास्तीत जास्त फायदा होतो. आपल्या दवाखान्यामध्ये प्रामुख्याने बाळंतकेसेस असल्याने बालरोगतज्ञ असणे अत्यंत गरजेचे आहे. म्हणून हॉस्पीटलाची व पर्यायाने पेशंटची गैरसोय होवु नये याकरिता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ अन्वये एक दिवसाचा तांत्रिक खंड देवुन दि.३१/१२/२०१२ ते ३०/६/२०१३ अखेर सहा महिन्याकरिता दरमहा रू.१५००/- च्या मानधनावर नेमणूक होणेस आस्थापना विभागास आदेश होणेस विनंती असे नमुद करून सुचित केले आहे.

यापुर्वी फिरता दवाखान्याकरिता तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी कंत्राटी करारानुसार दरमहा करारबध्द नियुक्ती मानधनावरचा प्रस्ताव निर्णयासाठी मा.स्थायी समिती कडे पाठविण्यांत आलेला होता. सदर प्रस्तावावर मा.स्थायी समितीने ठराव क्र. १३ दि.३०/४/२०१० अन्वये ठराव पारित होवुन त्यामध्ये परिच्छेद २ मध्ये खालीलप्रमाणे ठरावामध्ये नमुद केलेले आहे.

तसेच नागरिकांच्या सुविधेच्या दृष्टीकोनातुन फिरता दवाखाना तसेच आरोग्याच्या सर्व सेवा अत्यावश्यक असल्याने यापुढे वैद्यकीय अधिकारी, लॅब टेक्नीशियन , नर्सेस इ. चे काम समाधानकारक असल्यास त्यांचे पुर्ननेमणूक एक दिवस तांत्रिक खंड देवुन त्यांना नेमणूका देण्यांत याव्यात व प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी मा.स्थायी समिती कडे पाठविण्यात यावेत. असे नमुद करून सुचित केलेले आहे.

मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी कै.बा.दे.दवाखाना यांचेकडील जा.क्र. कै.बा.दे. दवाखाना व सुतिकागृह ५७३ दि.१३/९/२०१२ च्या प्रस्तावाच्या अनुषंगाने कै.बा.दे. दवाखाना व सुतिकागृह येथे जा.क्र.आस्थापना कंत्राटी करारबध्द नेमणूक ४३८५ दि.२३/१०/२०१२ अन्वये १. डॉ.श्री. अनिरूध्द गिते व २. डॉ.श्री. सुचित तांबोळी यांची तात्पुरत्या स्वरूपात बालरोग तज्ञ (ऑनररी डॉक्टर) यापदी कंत्राटी करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे दि.३०/६/२०१२ ते दि.२९/१२/२०१२ अखेर सहा महिन्याच्या कालावधी मध्ये दरमहा रू.१५००/- या मानधनावर करारबध्द नियुक्ती करण्यांत आलेली होती व सदरची मुदत समाप्त झालेली आहे.

मा.स्थायी समिती ठराव क्र.१३ दि.३०/४/२०१० च्या ठरावाच्या अनुषंगाने वरिलप्रमाणे केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळण्याकरिता सदरचा प्रस्ताव जा.क्र. वर्कशीट २०१० दि.३१/१०/२०१२ अन्वये मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात आलेला होता. सदरच्या प्रस्तावास मा.स्थायी समिती ठराव क्र.५७ दि.२३/११/२०१२ अन्वये सदर केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी दिलेली आहे.

तरी मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी कै.बा.दे.दवा. यांचेकडील जा.क्र.कै.बा.दे.दवा. व सुतिकागृह९७६दि.९/१/२०१३अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेच्या कै.बा.दे.दवाखाना करिता १]डॉ.श्री.अनिरूध्द गिते M.D.२]डॉ.सुचित तांबोळी M.B. B. S. D. C. H.P.G.D.M.L.S.यांची जा.क्र.आस्था./ कंत्राटी करारबध्द नेमणूक ९९६७ दिनांक २०/३/२०१३अन्वये तात्पुरत्या स्वरूपात बालरोग तज्ञ (ऑनररी डॉक्टर) या पदावर नेमणूक आदेशातील अटी व शर्ती प्रमाणे कंत्राटी करारानुसार दरमहा रू.१५००/- (अक्षरी रूपये पंधराशे मात्र) या मानधनावर दि.३१/१२/२०१२ ते दि.३०/६/२०१३ अखेर सहा महिन्याच्या कालावधीकरिता केलेल्या करारबध्द नेमणूकीस कार्योत्तर मंजुरी मिळणेकरिता सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे सविनय सादर.

येणे प्रमाणे आस्थापना प्रमुख / सहाय्यक आयुक्त यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह येथे तात्पुरत्या स्वरूपात बालरोग तज्ञ (ऑनरी डॉक्टर) यांची कंत्राटी करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे मानधनावरील करारबध्द नेमणुकीस कार्योत्तर मंजुरी मिळणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री.शेख आरिफ शे.र. :- कार्योत्तर मंजूरी असल्याने ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा
मा.श्री. सातपुते दि.ना.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.
मा.सभापती साहेब :- कार्योत्तर मंजूरी असल्याने ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिकागृह येथे तात्पुरत्या स्वरूपात डॉ.श्री.अनिरूध्द गिते M.D.,डॉ.सुचित तांबोळी M.B.B.S.D.C.H.P.G.D.M.L.S. बालरोग तज्ञ (ऑनरी डॉक्टर) यांची अटी व शर्ती प्रमाणे कंत्राटी करारानुसार दरमहा रू.१५००/- (अक्षरी रूपये पंधराशे मात्र) या मानधनावर दि.३१/१२/२०१२ ते दि.३०/६/२०१३ अखेर सहा महिन्याच्या कालावधीकरिता केलेल्या करारबध्द नेमणूकीस कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन सही /-

अनुमोदक :- मा.श्री. सातपुते दिलीप नानाभाउ सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०१**

विषय क्रमांक- १४ सोमवार दिनांक ८/४/२०१३

ठराव क्रमांक - १४ सोमवार दिनांक ८/४/२०१३

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी पॅनलशिपवर कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात भुलतज्ञ यापदी अटी व शर्ती नुसार करारबध्द नियुक्ती करीता मानधन वाढविणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. आस्थापना विभाग जा.क्र./वर्क. २७३ दि.२५/३/२०१३

संदर्भ- कै.बा.दे.दवाखाना व सुतिकागृह यांचेकडील दि.६/१/२०१३ चा प्रस्ताव.

सादर,

विनंती सादर करण्यांत येतो की, कै.बा.दे.दवाखाना व सुतिकागृह यांनी त्यांचेकडील दि.६/१/१३ अन्वये इकडेस प्रस्ताव सादर करून त्यामध्ये कै.बा.दे. दवाखाना येथे गरोदर स्त्रियांचे सिझर ऑपरेशन करताना भुलतज्ञांची आवश्यकता असल्याने खाजगी व्यवसायीक भुलतज्ञांची तात्पुरत्या स्वरूपात पॅनलशिपवर मानधनावर नेमणूक करण्यात येत असते. त्यानुसार मा.स्थायी समिती ठराव क्र.८३ दि.२२/१/२०११ अन्वये व जा.क्र. ३६२० दि.४/२/२०११ अन्वये खाजगी भुलतज्ञांची तात्पुरत्या स्वरूपात दि.६/१/२०११ ते ५/१/२०१४ अखेर तीन वर्षाकरिता नेमणूक करण्यांत आलेली आहे. त्याप्रमाणे मेजर ऑपरेशन करिता रू.५००/- व मायनर ऑपरेशन करिता रू.२५०/- मानधनावर शहरांतील १६ भुलतज्ञं डॉक्टरांची पॅनलशीपवर नेमणूक करण्यांत आलेली आहे. त्यानंतर वरील संदर्भानुसार पॅनलशिपवर भुलतज्ञांच्या इंडियन सोसायटी ऑफ ॲनेस्थेशिया लॉजिस्ट, अहमदनगर या संस्थेने सध्याच्या भुलीचे मानधन खाजगी दवाखान्याच्या तुलनेने अत्यल्प असल्याने येथुन पुढे मायनर ऑपरेशन करिता रू.५००/- व मेजर ऑपरेशन करिता रू.१०००/- नाईट ॲण्ड हायरिस्क केसेस करिता रू.१५००/- याप्रमाणे प्रत्येक भुलकरिता मानधन वाढीसंदर्भात विनंती पत्र दिलेले आहे. तसेच त्यांनी थिएटर व पोस्ट ऑपरेटीव्ह उपचाराकरिता मल्टीपॅरा मॉनिटर्स व पुर्णवेळ डॉक्टर उपलब्ध ठेवणेबाबत विनंती केलेली आहे. मल्टी पॅरा मॉनिटर्स खरेदीबाबत.दवाखान्यामार्फत प्रस्ताव मंजुर करून मनपा स्टोअर विभागामार्फत खरेदी करणेकामी देण्यांत आलेली आहे. अद्याप सदरचे उपकरण दवाखान्याकरिता प्राप्त झालेले नाहीत. तसेच दवाखान्याकडील पुर्ण वेळ डॉक्टर उपलब्ध करणेकामी कंत्राटी करारपध्दतीने चार एम.बी.बी. एस. अथवा बी.ए.एम.एस. डॉक्टर थेट पध्दतीने भरण्याची प्रक्रिया आस्थापना विभागामार्फत सुरू आहे.तसेच त्यांच्या भुल करिता देण्यात येणा-या मानधन वाढीबाबत चौकशरी केली असता सध्या शहरामध्ये खाजगी रूग्णालयामध्ये भुल देण्याकरिता मायनर ऑपरेशन करिता रू.९००/- मेजर ऑपरेशन करिता रू.२०००/- नाईट ॲण्ड हायरिस्क केसेस करिता रू.२५००/- आकारण्यांत येतात. सध्या कै.बा.दे. दवाखान्यामधील भुलतज्ञ डॉक्टरांना मेजर ऑपरेशन करिता रू.५००/-व मायनर ऑपरेशन करिता रू.२५०/- मानधन अदा केले जाते. तसेच नाईट ॲण्ड हायरिस्क करिता कुठेलही वेगळे मानधन अदा केले जात नाही. त्यामुळे रात्रीच्या वेळी भुलतज्ञ डॉक्टरांची आवश्यकता भासल्यास भुलतज्ञ उपलब्ध होत नाहीत. तरी पॅनलशीपवरील शहरांतील भुलतज्ञांच्या इंडीयन सोसायटी ऑफ ॲनेस्थेशिया लॉजिस्ट, अहमदनगर या संस्थेच्या मागणीनुसार प्रत्येक मायनर ऑपरेशन करिता रू.५००/- मेजर ऑपरेशन करिता रू.१०००/- नाईट ॲण्ड हायरिस्क

केसेस करिता रू.१५००/- या प्रमाणे मानधन वाढविणेकामी प्रस्ताव मान्यतेस्तव सविनय सादर असे नमुद करून सुचित केलेले आहे. **सदर प्रस्तावावर मा. प्रभारी आरोग्याधिकारी यांनी प्रस्तावीत "अ" नुसार व्हिजीट चार्जेस मध्ये वाढ करणे उचित वाटते मात्र सदरची वाढ पुढील तीन वर्षासाठी राहील व सदर वाढीबाबत मंजुरीस्तव विषय मा.स्थायी समिती पुढे ठेवणेबाबत मंजुरीस्तव तथापी आदेशार्थ सादर असे असे नमुद करून सुचित केलेले आहे.** कै.बा.दे. दवाखाना व सुतिकागृह येथे इच्छुक भुलतज्ञांची दि.६/१/११ ते दि.५/१/१४ अखेर तीन वर्षाकरिता प्रत्येक मेजर ऑपरेशन करिता रू.४००/- व प्रत्येक मायनर ऑपरेशन करिता रू.२००/- याप्रमाणे पॅनलशीपवर नेमणूक करण्यांस मंजुरी मिळणेबाबत कै.बा.दे.दवाखाना व सुतिकागृह जा.क्र. ६५३ दि.०७/१२/१० अन्वये मा.स्थायी समितीकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. सदर प्रस्तावावर मा.स्थायी समितीने स्थायी समिती ठराव क्र.८३ दि.१२/०१/११ अन्वये खालील प्रमाणे ठराव पारित केलेला आहे.

अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह येथे इच्छुक भुलतज्ञांची दि.६/१/११ ते ५/१/१४ अखेर तीन वर्षाकरिता प्रत्येक मेजर ऑपरेशन करिता रू.४००/- ऐवजी रू.५००/- (रू. पाचशे फक्त) व प्रत्येक मायनर ऑपरेशन करिता रू.२००/- ऐवजी रू.२५०/- (रूपये दोनशे पन्नास फक्त) याप्रमाणे मानधनात वाढ करून भुलतज्ञांची पॅनलशीपवर नेमणूक देण्यास मंजुरी देयांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी. सदर ठरावाच्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेमधील कै.बा.दे.दवाखाना व सुतिकागृह जा.क्र. आस्थापना ३६२० दि.४/२/११ अन्वये १. डॉ.सौ. सायंबर व इतर १५ यांची पॅनलशीपवर कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात भुलतज्ञ या पदी दि.६/१/११ ते ५/१/१४ अखेर प्रत्येक मेजर ऑपरेशन साठी रूपये ५००/- (रू. पाचशे फक्त) व प्रत्येक मायनर ऑपरेशनसाठी रू.२५०/- (रूपये दोनशे पन्नास फक्त) यावर तीन वर्षाकरिता अटी व शर्तीप्रमाणे करारबध्द नियुक्ती करण्यात आलेली आहे. तद्नंतर मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी यांनी त्यांचेकडील जा.क्र.कै.बा.दे. दवाखाना व सुतिकागृह २१२ दि.१२/७/११ अन्वये प्रस्ताव सादर करून कै.बा.दे. दवाखाना व सुतिकागृह येथे तात्पुरत्या स्वरूपात भुलतज्ञ या पदी डॉ. प्रतिभा आर. भोसले यांची मा.स्थायी समिती ठराव क्र.८३ दि.१२/१/११ मध्ये नमुद केल्याप्रमाणे सदर इतर कालावधी करिता दर्शविलेल्या मानधनामध्ये समाविष्ट करणेबाबत सुचित केलेले होते. त्यानुसार इकडील जा.क्र. आस्थापना ५४ दि.८/९/११ अन्वये मंजुरीसाठी निर्णयास्तव प्रस्ताव मा.स्थायी समिती कडे पाठविण्यात आलेला होता. त्यानुसार मा.स्थायी समितीने ठराव क्र.४५ दि.२३/९/११ अन्वये ठराव पारित करून कै.बा.दे.दवाखाना व सुतिकागृह येथे तात्पुरत्या स्वरूपात डॉ. प्रतिभा आर.भोसले (भुलतज्ञ) यांना कंत्राटी करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे भुलतज्ञांच्या पॅनलमध्ये समाविष्ट करण्यांस मंजुरी दिलेली होती त्यानुसार कै.बा.दे.दवाखाना व सुतिकागृह येथे जा.क्र. आस्थापना २९४७ दि.२९/१०/११ अन्वये डॉ.प्रतिभा आर.भोसले यांची पॅनलमध्ये कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात भुलतज्ञ या पदी दि.६/११/११ ते दि.५/१/१४ अखेर प्रत्येक मेजर ऑपरेशन साठी रू.५००/- व प्रत्येक मायनर ऑपरेशन साठी रू.२५०/- याप्रमाणे अटी व शर्ती प्रमाणे समाविष्ट करून करारबध्द नेमणूक केलेली आहे. सद्यस्थिती मध्ये अहमदनगर महानगरपालिककेमधील कै.बा.दे. दवाखाना येथे पॅनलशीपवर भुलतज्ञ या पदावर अटी व शर्ती नुसार करारबध्द नियुक्तीबाबत मानधन दर बाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | पॅनलशीपवरील तात्पुरत्या स्वरूपात पदनाम | विभाग | सध्याचे देण्यांत येणार मानधन दर | संदर्भिय प्रस्तावामध्ये प्रस्तावीत करण्यांत आलेले मानधन दर |
|---|---|---|---|---|
| १ | भुलतज्ञ | कै.बा. दे.दवा. | १.प्रत्येक मायनर ऑपरेशन साठी रू.२५०/-<br>२.प्रत्येक मेजर ऑपरेशन साठी रू.५००/- | १.प्रत्येक मायनर ऑपरेशन साठी रू.५००/-<br>२.प्रत्येक मेजर ऑपरेशन साठी रू.१०००/-<br>३.प्रत्येक नाईट ॲण्ड हायरिस्क करिता रू.१५००/- |

तरी मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी यांचे संदर्भिय प्रस्तावाच्या अनुषंगाने व त्यावरील मा.प्र.आरोग्याधिकारी यांनी सुचित केल्यानुसार कै.बा.दे. दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी पॅनलशीलपवर कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात भुलतज्ञ या पदांकरिता अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द नियुक्ती बाबत मानधनवाढी करीता बाबतचा प्रस्ताव पुर्व मंजुरीसाठी मा.स्थायी समिती पुढे निर्णयाकरीता सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख / सहाय्यक आयुक्त यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी पॅनलशिपवर कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात भुलतज्ञ यापदी अटी व शर्ती नुसार करारबध्द नियुक्ती करीता मानधन वाढविणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.सभापती साहेब :- मानधन किती आहे.

प्र.आरोग्याधिकारी डॉ. राजूरकर :- ऑन कॉल भूलतज्ञाच पथक नेमल आहे. त्यांना आपण जे चार्जेस देतो ते २०११ मध्ये ठरले आहे. असोसिएशन ने पत्र देउन सांगितले की मायनरऑपरेशनला रूपये ५००/-, मेजर ऑपरेशन रूपये १०००/- , नाईट ॲण्ड हायरिस्क रूपये १५००/-याप्रमाणे दर मागणी केली आहे. रोज सात आठ ऑपरेशन रोज होतात.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- बाहेरपेक्षा आपले रेट कमी आहेत का ?

प्र. आरोग्याधिकारी डॉ. राजूरकर :- होय

मा.सौ.गंधे सु.मो.:- महत्वाची आरोग्य सेवा असल्याने ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री.कवडे उ.खं. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- बी.डी.सी.डी. येथे आरोग्य सेवा महानगरपालिका पुरविते. त्याचा लाभ गोरगरीब व गरजू रूग्णांना होत आहे. त्याकरीता भुलतज्ञांच्या मानधन वाढविण्याचा ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिकागृह येथे अत्यावश्यक सेवेसाठी पॅनलशिपवर कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात भुलतज्ञ यापदी अटी व शर्ती नुसार करारबध्द नियुक्ती करीता खालील तक्ता प्रमाणे मानधन वाढविणेस मंजुरी देण्यांत येत आहे.

| पॅनलशीपवरील तात्पुरत्या स्वरूपात पदनाम | विभाग | सध्याचे देण्यांत येणार मानधन दर | मा.स्थायी समितीने मंजुर केलेले वाढीव मानधन दर |
|---|---|---|---|
| भुलतज्ञ | कै.बा. दे.दवा. | १.प्रत्येक मायनर ऑपरेशन साठी रू.२५०/-<br>२.प्रत्येक मेजर ऑपरेशन साठी रू.५००/- | १.प्रत्येक मायनर ऑपरेशन साठी रू.५००/-<br>२.प्रत्येक मेजर ऑपरेशन साठी रू.१०००/-<br>३.प्रत्येक नाईट ॲण्ड हायरिस्क करिता रू.१५००/- |

ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.
नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी
सुचक :- मा.सौ. गंधे सुमन मोहनीराज सही /-

अनुमोदक :- मा.श्री. कवडे उमेश खंडेराव सही /-
ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती ,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०१**

विषय क्रमांक- १५ सोमवार दिनांक ८/४/२०१३

ठराव क्रमांक - १५ सोमवार दिनांक ८/४/२०१३

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सावेडी न.र.यो.क्र.-४अंतिम भूखंड क्रमांक १२९(पैकी )प्रोफेसरकॉलनी येथे बंदिस्त नाटयगृह बांधणेकामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट मंजूरीस्तव.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. सार्व.बांधकाम विभाग दि.३/३/२०१३

मा.सादर,

उपरोक्त विषयान्वये खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१]प्रशासकीय मान्यता :अ) मा.शासनाचे पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,शासन निर्णय क्र.नागृबां-२०१० /प्र.क्र.३३० सा.का १ / मंत्रालय, मुंबई दि.१२ऑक्टोंबर २०१०

ब ) मा.स्थायी समिती ठराव क्र.८१ दि.२५/१/२०१२

२] प्रशासकीय मान्यता रक्कम रू. : ५,७३,६५,४५६/-

३] तांत्रिक मान्यता रक्कम रू. : ५,७३,६५,४५६/-

४] तंात्रिक मान्यतेची दरसुची : सन २०१०-११

५] निविदा (परिशिष्ट "ब") रक्कम रू. : ५,७३,६५,४५६/-

६] ऑनलाईन ई - निविदा क्र.५०१ सन २०१२-२०१३

७] निविदा विक्री कालावधी : २६/१२/२०१२ ते ३०/०१/२०१३

८] निविदा स्विकारण्याची तारीख : ०७/१०/२०१३ ते १०/०१/२०१३

९] निविदा उघडण्याची तारीख : १०/०१/२०१३ ते ११/०१/२०१३

१०] कामाची मुदत : महिने

११] प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील :

| **अ.नं.** | **ठेकेदाराचे नांव** | **देकार** |
|---|---|---|
| १ | मे.ए.सी.कोठारी, अहमदनगर | २७.२७% जादा |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने ए.सी.कोठारी, अहमदनगर यांचा देकार २७.२७% जादा आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक सन २०१०-२०११ चे दरसुची नुसार तयार करण्यात आले होते. सन २०११-२०१२ चे सुधारित दरसूचीशी अंदाजपत्रकाची तुलना करता सदर निविदा दर ४.७३% जादा येत आहे. संबंधित निविदाधारक मे.ए.सी. कोठारी, अहमदनगर यांना दराचे वाटाघाटीकरीता दि.१३/२/२०१३ रोजी छाननी समितीसमोर बोलाविले असता सविस्तर झालेल्या चर्चेनुसार इंधन फरक व इन्शुरन्स १% यांचा लक्षात घेता निविदा दरापेक्षा १४.७२% जादा दराने करणेस तयार असलेबाबत दि.१३/२/२०१३ रोजीच पत्रान्वये कळविले आहे.

निविदेबाबतच्या खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे..

| | | |
|---|---|---|
| १२ | सुधारीत देकारानुसार येणारी किंमत | ६,५८,०९,६५१.१२ |
| १३ | चालु दरसुची सा.बां.२०११-१२ अनुसार कामाची अद्यावत किंमत | ६,००,७८,८४२.०० |
| १४ | ठेकेदाराची सुधारीत किंमत व कामाची अद्यावत किंमत या मधील फरक | ५७,३०,८०९.१२ |
| १५ | चालु दरसुची नुसार अधिक्याची टक्केवारी (१४ x १००) / १२ | ९.५४ % |

तरी मा. छाननी समितीने केलेल्या शिफारशीनुसार सदरची निविदा ठेकेदार मे.ए.सी. कोठारी, अहमदनगर यांना निविदा दरापेक्षा १४.७२% जादा दराची निविदा मंजुरीस्तव मा.स्थायी समितीकडेस पाठविणेस ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

येणेप्रमाणे कनिष्ठ अभियंता यांचा अहवाल असे.

यावर इनचार्ज अभियंता यांचा अभिप्राय की, मे.ए.सी. कोठारी यांचे वाटाघाटी नंतर दिलेल्या अंतिम निविदा दर १४.७२% निविदा रकमेपेक्षा जादा दराची तुलना सुधारित दरसुचीशी केली असता यांचा अंतिम देकार ९.५४% येतअसून मा.छाननी समितीने शिफारस केली आहे. त्यास मा.स्थायी समितीच्या मंजुरीची आवश्यकता आहे. तरी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर ठेवणेस आदेशार्थ सादर. /**अ**

यावर शहर अभियंता यांचा सहमती दर्शक सही

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, **"अ"** प्रमाणे मान्यतेस सादर.

यावर उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत **"अ"** प्रमाणे निविदा मंजुरीस्तव मा.स्थायी समिती पुढे ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, **"अ"** नुसार मान्य दि.२२/३/१३

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- सावेडी न.र.यो.क्र.-४अंतिम भूखंड क्रमांक १२९(पैकी )प्रोफेसरकॉलनी येथे बंदिस्त नाटयगृह बांधणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

शहर अभियंता श्री. कुलकर्णी :- प्रोफेसर कॉलनी येथील नाटयगृह बांधणेकामी निविदा मागवली होती त्याला कोणीही प्रतिसाद दिला नाही. फेर निविदा क्र.४ चे निविदा धारक मे. ए.सी. कोठारी यांना दि.१३/२/२०१३ रोजी मा.छाननी समिती वाटाघाटीसाठी बोलावले. त्यावेळी निविदा दरापेक्षा १४.७२% जादा दराने काम करणेस तयार असलेबाबत त्यांनी पत्र दिले.त्याप्रमाणे प्रस्ताव सादर केला आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- छाननी समितीत फक्त दराबाबत बोलणी झाली का ?

उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे :- कागदपत्रे तपासणी व दर वाटाघाटी झाल्या.

मा.श्री.डागवाले कि.आ.:-आम्ही तुम्हाला आधीच सांगितल की वाटाघाटीकरीता आमच्या समोर बोलवा. त्याची करायची क्षमता आहे का. तो काम घेतो पुर्ण करीत नाही. त्याला समक्ष बोलवा.

उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे :- मी तसे आदेश करतो.

शहर अभियंता श्री. कुलकर्णी :- त्याच्या कडे तीनच काम प्रगती पथावर आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- ठेकेदार काम करील का. काम अपुर्ण नको रहायला.

मा.सभापती साहेब :- त्यांच्याकडे आज किती कामे आहेत. कोणत्या स्टेजला आहेत तक्ता द्या.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- ठेकेदाराला समिती समोर बोलवा.

शहर अभियंता श्री. कुलकर्णी :- ठेकेदाराने निविदा रक्कम कमी केली आहे.

मा.श्री. सातपुते दि.ना. :- आज २२-२३ रस्ते चालू आहेत. त्या पैकी किती प्रगती पथावर आहेत.

शहर अभियंता श्री. कुलकर्णी :- ३-४ रस्ते प्रगती पथावर आहेत. बाकी नाही.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- ई- निविदा कोणत्या पेपरला आली होती.

मा.श्री. जगताप नि.वि. :- ई- निविदा कोणी बघत नाही. पेपरला दया.

शहर अभियंता श्री. कुलकर्णी :-५ कोटीच्या वरच्या कामाचे बातमी आपण राज्यस्तरीय पेपरला देतो.

मा.श्री. डागवाले कि.आ. :-वर्तमानपत्र सांगा.

इनचार्ज अभियंता श्री. सोनटक्के :- दै. देशदूत मध्ये निविदा प्रसिध्दीस दिली होती.

मा.श्री. सातपुते दि.ना. :- तो काम करणार का नाही ते सांगा नाहीतर खर्च वाढेल व काम तसेच राहिल.

मा.सभापती साहेब :- त्यांना समितीत बोलवा.

मा.सौ. खरमाळे सं.र.:- काम किती दिवसात करणार.

शहर अभियंता श्री. कुलकर्णी :- ठेकेदार मुंबईमध्ये आहेत.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- त्याला बोलवा इथे, त्यांना परवडत नाही मग काम कशाला घेतात.

मा.श्री. कवडे उ.खं. :- ऑफिस रिपोर्टास मंजुरी दयावी. ठेकेदाराने मुदतीत काम न केल्यास दंडात्मक कारवाई करण्यांत यावी.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- ऑफिस रिपोर्टास मंजुरी दयावी. ठेकेदाराकडून मुदतीत काम करून घ्यावे अन्यथा दंडात्मक कारवाई करण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा. शहरातील रंगकर्मी, नाटयप्रेमीची सातत्याने होणारी मागणीचा व आंदोलनाचा विचार करता निविदाधारकाने विहीत मुदतीत काम पुर्ण करणे गरजेचे आहे. संबंधित निविदा धारकाने वेळेत काम पुर्ण न केल्यास त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यांत यावी.

**<u>ठराव :-</u>**अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सावेडी न.र.यो.क्र.-४अंतिम भूखंड क्र.१२९(पैकी) प्रोफेसरकॉलनी येथे बंदिस्त नाटयगृह बांधणेकामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट पहाता मा. छाननी समितीने केलेल्या शिफारशीनुसार निविदा धारक मे.ए.सी. कोठारी, अहमदनगर यांना निविदा दरापेक्षा १४.७२% जादा दराने देण्यांस मंजुरी देण्यांत येत आहे.

तसेच शहरातील रंगकर्मी, नाटयप्रेमी ची सातत्याने होणारी मागणीचा व आंदोलनाचा विचार करता निविदाधारकाने विहीत मुदतीत काम पुर्ण करणे गरजेचे आहे. संबंधित निविदा धारकाने वेळेत काम पुर्ण न केल्यास त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यांत यावी. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सचुक :- मा.श्री. कवडे उमेश खंडेराव, सही /-

अनुमोदक :- मा.श्री. डागवाले किशोर आसाराम सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०१**

विषय क्रमांक- १६ सोमवार दिनांक ८/४/२०१३

ठराव क्रमांक - १६ सोमवार दिनांक ८/४/२०१३

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात जन संपर्क अधिकारी, लॅब टेक्निशियन, स्टाफ नर्स या पदांवर अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर केलेल्या करारबध्द नेमणूकीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. आस्थापना विभाग जा.क्र./वर्क. २७६ दि.३०/३/२०१३

संदर्भ- रक्तपेढी विभाग जा.क्र. २३३ दि.४/२/२०१३ अन्वयेचा प्रस्ताव.

विनंती की, रक्तपेढी विभाग जा.क्र. २३३ दि.४/२/२०१३ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये रक्तपेढी विभागामध्ये तक्त्यात दर्शविल्या प्रमाणे कर्मचारी कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात रक्तपेढी विभागामध्ये मानधनावर काम करत असुन त्यांचा कालावधी १/१०/२०१२ ते ३१/३/२०१३ अखेर आहे. तरी रक्तपेढी विभागासाठी सदर कर्मचा-यांची पुढील सहा महिन्याकरीता नेमणूक करण्यात यावी ही विनंती असे नमुद करून सुचित केले आहे.

| अ.क्र. | नावं | पद | कालावधी |
|---|---|---|---|
| १ | श्री. संतोष काळे | जनसंपर्क अधिकारी | १/१०/२०१२ ते ३१/३/२०१३ |
| २ | सौ. सुनिता गरड | लॅब टेक्नीशियन | १/१०/२०१२ ते ३१/३/२०१३ |
| ३ | श्री. शेख नईम | लॅब टेक्नीशियन | १/१०/२०१२ ते ३१/३/२०१३ |
| ४ | सौ. गायकवाड शिल्पा | स्टाफ नर्स | १/१०/२०१२ ते ३१/३/२०१३ |
| ५ | श्रीमती सुलभा पवळ | स्टाफ नर्स | १/१०/२०१२ ते ३१/३/२०१३ |
| ६ | श्रीमती अनिता तोडमल | स्टाफ नर्स | १/१०/२०१२ ते ३१/३/२०१३ |

सदर वरील प्रस्तावावर मा.प्र.आरोग्याधिकारी यांनी 'अ' प्रमाणे पुढील ६ महिन्याकरीता कंत्राटी पध्दतीने पुर्नेनियुक्ती देणेस मान्यतेस्तव तथापि आस्थापना विभागास आदेशार्थ सादर. असे नमुद करून सुचित केलेले आहे.

मा.मुख्य वैद्यकीय अधिकारी, कै.बा.दे.दवा. यांचेकडील दि.२२/२/२०१२ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेच्या रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार सहा महिन्याकरीता दरमहा मानधनावर थेट पध्दतीने (Walk In Interview) नुसार उमेदवारांच्या मुलाखती दि.२/४/२०१२ रोजी आयोजित करण्यांत येत असल्याबाबत दैनिक नगर केसरी या वर्तमानपत्रामध्ये दि.१४/३/२०१२ रोजी जाहिरात प्रसिध्दीस देण्यांत आलेली होती.

सदर जाहिरातीच्या अनुषंगाने मा.आयुक्त तथा अध्यक्ष, निवड समिती, अहमदनगर महानगरपालिका यांचे अध्यक्षतेखाली मा.निवड समिती यांनी उमेदवारांच्या मुलाखती घेवून पात्र ठरवुन निवड केलेली होती.

त्याअनुषंगाने जा.क्र.आस्था./ कंत्राटी करारबध्द नेमणूक ४४४४ दि.२४/९/२०१२ अन्वये रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे दि.१/१०/१२ पासून सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे दरमहा माधनावर रक्तपेढी विभागामध्ये करारबध्द नियुक्ती करण्यांत आलेली आहे.

वरील केलेल्या संबंधितांची कालावधीतील कंत्राटी करारबध्दाची नियुक्तीची मुदत ही दिनांक ३१/३/२०१३ रोजी समाप्त होत आहे.

यापुर्वी फिरता दवाखान्याकरिता तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदी कंत्राटी करारानुसार दरमहा करारबध्द नियुक्ती मानधनावरचा प्रस्ताव निर्णयासाठी मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात आलेला होता. सदर प्रस्तावावर मा.स्थायी समितीने ठराव क्र.१३ दि.३०/४/२०१०अन्वये ठराव पारित होवुन त्यामध्ये परिच्छेद २ मध्ये खालीलप्रमाणे ठरावामध्ये नमुद केलेले आहे.

तसेच नागरिकांच्या सुविधेच्या दृष्टीकोनातुन फिरता दवाखाना तसेच आरोग्याच्या सर्व सेवा अत्यावश्यक असल्याने यापुढे वैद्यकीय अधिकारी, लॅब टेक्नीशियन, नर्सेस इ. चे काम समाधानकारक असल्यास त्यांचे पुर्ननेमणूक एक दिवस तांत्रिक खंड देवुन त्यांना नेमणूका देण्यांत याव्यात व प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी मा.स्थायी समितीकडे पाठविण्यांत यावेत असे नमुद करून सुचित केलेले आहे.

वरील रक्तपेढी विभाग जा.क्र. २३३ दि.४/२/२०१३ च्या प्रस्तावाच्या अनुषंगाने रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेकरीता खालील तक्त्यात दर्शविलेल्या संबंधितांची तात्पुरत्या स्वरूपात नमुद केलेल्या पदांवर जा.क्र. आस्था./ कंत्राटी करारबध्द नेमणूक १००४४ दि.२५/३/२०१३ अन्वय अटी व शर्ती प्रमाणे कंत्राटी करारानुसार तांत्रिक खंड देवून दिनांक ३/४/२०१३ पासून सहा महिन्याकरीता दरमहा मानधनावर रक्तपेढी विभागामध्ये करारबध्द नियुक्ती करण्यांत आलेली आहे.

| अ. क्र. | नावं | तात्पुरत्या स्वरूपात हुद्दा | दरमहा मानधन रक्कम | रूजू होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. संतोष भाउसाहेब काळे | जनसंपर्क अधिकारी | ७,०००/- | रक्तपेढी विभाग |
| २ | सुनिता आसाराम गरड | लॅब टेक्नीशियन | १३,०००/- | रक्तपेढी विभाग |
| ३ | शेख नईम युसूफ | लॅब टेक्नीशियन | १३,०००/- | रक्तपेढी विभाग |
| ४ | शिल्पा प्रभाकर गायकवाड | स्टाफ नर्स | ८,०००/- | रक्तपेढी विभाग |
| ५ | सुलभा प्रकाश पवळ | स्टाफ नर्स | ८,०००/- | रक्तपेढी विभाग |
| ६ | अनिता रमेश तोडमल | स्टाफ नर्स | ८,०००/- | रक्तपेढी विभाग |

तरी रक्तपेढी विभाग जा.क्र.२३३दि.४/२/२०१३च्या प्रस्तावाच्या अनुषंगाने अ.नगर महानगरपालिकेच्या रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेकरिता वरील तक्त्यात दर्शविलेल्या संबंधितांची जा.क्र.आस्था.कंत्राटी करारबध्द नेमणूक १००४४दि.२५/३/२०१३अन्वये तात्पुरत्या स्वरूपात नमुद केलेल्या पदावर नेमणूक आदेशातील अटी व शर्ती प्रमाणे कंत्राटी करारानुसार दर्शविलेल्या दरमहा मानधनावर तांत्रिक खंड देवून दि.३/४/२०१३ पासून सहामहिन्याच्या कालावधीकरिता केलेल्या करारबध्द नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी मिळणेकरिता सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख / सहाय्यक आयुक्त यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात जन संपर्क अधिकारी, लॅब टेक्निशियन, स्टाफ नर्स या पदांवर अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर केलेल्या करारबध्द नेमणूकीस कार्योत्तर मंजुरी मिळणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री.सातपुते दि.ना. :- कार्योत्तर मंजूरी असल्याने ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा

मा.श्री. शेख आरिफ शे. र. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टामध्ये नमूद कार्योत्तर मंजूरी असल्याने ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरूपात ऑफिस रिपोर्टामध्ये नमूद जनसंपर्क अधिकारी, लॅब टेक्निशियन, स्टाफ नर्स या पदांवर अटी व शर्ती प्रमाणे कंत्राटी करारानुसार मानधनावर दिनांक ३/४/२०१३ पासून सहा महिन्याच्या कालावधीकरीता केलेल्या करारबध्द नेमणूकीस कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. सातपुते दिलीप नानाभाउ सही /-

अनुमोदक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती ,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०१**

विषय क्रमांक- १७ सोमवार दिनांक ८/४/२०१३

ठराव क्रमांक - १७ सोमवार दिनांक ८/४/२०१३

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार डॉ.श्री.एस.के.आहुजा, रा.शांतीपुर,तारकुपर,अ.नगर यांचे प्रभाग समिती क्र.३,वॉर्ड क्रमांक४२ या मिळकतीचे बील क्रमांक ४४२ सन १९९५ते २०१३अखेर पाणीपट्टी निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट .

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. प्रभाग समिती क्र.३ दिनांक ३/१/२०१२

संदर्भ :- डॉ. श्री. एस.के. आहुजा यांचा दि.२९/११/११ रोजीचा अर्ज

विनंती अहवाल सादर करण्यांत येतो की, डॉ.श्री.एस.के. आहुजा यांनी वरील संदर्भानुसार अर्ज देउन विनंती केली की, मी ३५ वर्षापासुन शांतीपुर येथे दवाखाना चालवीत आहे. सदर जागेमध्ये पालिकेकडून नळ कनेक्शन घेतलेले नाही त्यामुळे पाणीपट्टी रद्द करावी अशी विनंती केली आहे.

वास्तवीक परिस्थिती अशी की, वॉर्ड क्र.४२ बी.क्र. ४४२ वर श्री. गोपीचंद ताराचंद छाबडा यांची मिळकत आहे. त्या मिळकतीवर सन १९९५ ते २०१२ अखेर घरपट्टी रू.२२,५३१/- व पाणीपट्टी रू.२०,५३६/- अशी दोन्ही मिळुन रू.४३,०६७/- इतकी शास्ती वगळता संगणकावर थकबाकी आहे.

डॉ.श्री.एस.के.आहुजा यांनी श्री.गोपीचंद ताराचंद छाबडा यांच्याकडुन सदरची जागा खरेदी केलेली आहे.मात्र अद्याप पावेतो मालमत्ता हस्तांतरण केलेले दिसुन येत नाही. डॉ.श्री.आहुजा यांनी अर्जासोबत सन१९९५ते २००८पर्यत अदा केलेल्या पावत्यांच्या छायांकित प्रती जोडलेल्या आहे. त्यानुसार श्री.गोपीचंद ताराचंद छाबडा यांनी सन २००७-०८अखेर घरपट्टी अदा केल्याचे दिसुन येत आहे.

अर्जदार यांच्या अर्जानुसार या प्रभागाकडील पाणी पुरवठा फिटर यांना जा.क्र. ६३६ दि.१९/११/११ अन्वये सदर ठिकाणी नळ कनेक्शन आहे किंवा नाही ? या बाबतचा अहवाल सादर करणेबाबत कळविले असता त्यांनी श्री.गोपीचंद ताराचंद छाबडा यांच्या मिळकतीची दि.२०/१२/११ रोजी समक्ष पाहणी केली असता सदर ठिकाणी नळ कनेक्शन नसल्यचे आढळुन आलेले आहे असा अहवाल दि.२०/१२/१२ रोजी सादर केलेला आहे.

सदरचा अहवाल सादर केल्यानंतर दि.३/१/२०११ रोजी समक्ष पाहणी केली असता सदर ठिकाणी नळकनेक्शन आढळुन आलेले नाही. त्यामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ व ४८५/१ नुसार सन १९९५ ते २०१२ पासुन रू.२०,५३६/- इतकी आकारलेली पाणीपट्टी रद्द करणे संयुक्तीक वाटते तथापी आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे वसुली लिपिक , प्र.स.क्र.-३ यांचा अहवाल असे.

यावर प्रभाग अधिकारी क्र.३ यांचा अभिप्राय की, सादर रिपोर्टास सहमत रिपोर्टानुसार तपासुन पुढील कार्यवाहीस्तव

यावर मा.स.क.मु.अ. यांचा अभिप्राय की , प्रभाग अधिकारी प्रभाग समिती क्र.३ सदरचे प्रकरण मा.आयुक्त साहेब यांनी गठीत केलेल्या मा. पाहणी समिती पुढे सादर करावे.

यावर वसुली लिपिक यांचा अभिप्राय की, फेरसादर विनंती फेरसादर की, दि.२०/३/१२ रोजी पाणी पुरवठा समितीने सदर मिळकतीचे नळ कनेक्शनची पाहणी केली असता पुर्वीचे कनेक्शनबाबत स्पष्ट बोध न झाल्याने पाणी पुरवठा फिटर प्र.स.क्र.-३ यास सदर ठिकाणी मिळकतीसमोरील मुख्य पाईप लाईनवर खोदाई करून नळ कनेक्शन आहे किंवा नाही याची समक्ष खात्री करण्याबाबत पत्र देण्यांत आले होते. त्यानुसार प्रभाग अभियंता (पा.पु. ) व पाणी पुरवठा फिटर यांनी सदर ठिकाणी मुख्य पाईप लाईनवर खोदाई करून नळ कनेक्शनची तपासणी केली असता पूर्वीचे कनेक्शन असल्याचे आढळुन आले नाही. तथापी पुढील आदेशार्थ रिपोर्ट सविनय सादर. **/अ**

यावर प्रभाग अधिकारी क्र.३ यांचा अभिप्रायक की, फेरसादर **"अ"** अनुसार फेरसादर मा. पहाणी समिती (नळजोड) यांजकडेस सविनय सादर

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, प्रभाग अधिकारी प्र.स.क्र. ३ यांचे अभिप्रायानुसार पुढील आदेशार्थ सादर.

यावर वसुली लिपिक यांचा अभिप्राय की, मा. पहाणी समिती नसल्याने प्रकरण पेंडीग राहीले. पाहणी अहवाल जोडला आहे.

यावर प्रभाग अधिकारी क्र.३ यांचा अभिप्राय की, फेरसादर सोबत पहाणी अहवाल जोडत आहे

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १५१ नुसार रक्कम निर्लेखित करण्याचे अधिकार मा. स्थायी समिती यांचकडे असल्याने सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती कडे पाठविणे उचित सबब आदेशार्थ.

यावर आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, समक्ष चर्चा करावी.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, चर्चा झाली प्रस्तावानुसार मान्य करणे योग्य सबब आदेशार्थ.

यावर आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, चर्चा केली त्यानुसार मान्यता देणेत येते.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :-अर्जदार डॉ.श्री.एस.के.आहुजा यांचे वॉर्ड क्रमांक४२ या मिळकतीचे सन १९९५ते २०१३अखेर पाणीपट्टी निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.सभापती साहेब :- किती दिवस लावले, तुमच्याकडे किती विषय आहे.

प्रभाग समिती क्र. ३ श्री. वर्मा :- माझ्याकडे माणसचे नाही माझ्याकडे आणखी ७ ते ८ प्रकरण पेंडीग आहे. ७ कर्मचारी कमी आहेत.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- डॉ. डोईफोई साहेब कामगार दया.

मा.सौ.खरमाळे सं.र.:-डॉ.डोईफोडे साहेब,नळपट्टी घरपट्टी एकत्र आहे.तुमच्याकडे कर्मचारी किती आहे.

प्रभाग समिती क्र. ३ श्री. वर्मा :- बिगारी आहेत त्यांना काम जमत नाही साहेब..

मा.सौ. खरमाळे सं.र. :- पाहणी बिगारी करतात अधिकारी करतात का ?

प्रभाग समिती क्र. ३ श्री. वर्मा :- पाहणी समिती करते त्यामध्ये नमूद रक्कम रूपये २२,०३६/- सन १९९५ ते २०१३ अखेरची निर्लेखित करायची आहे.

मा.श्री.शेख आरिफ शे.र.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. सातपुते दि.ना. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-** अर्जदार डॉ.श्री.एस.के.आहुजा, रा.शांतीपुर,तारकुपर,अ.नगर यांचे प्रभाग समिती क्र.३,वॉर्ड क्रमांक४२,बील क्रमांक ४४२ या मिळकतीचे सन १९९५ते २०१३अखेरची पाहणी समिती अहवालामध्ये नमूद रक्कम रूपये२२,०३६/-(रूपये बावीस हजार छातीस फक्त) पाणीपट्टी निर्लेखित करण्यांस मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन सही /-

अनुमोदक :- मा.श्री. सातपुते दिलीप नानाभाउ सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०१**

विषय क्रमांक- १८ सोमवार दिनांक ८/४/२०१३

ठराव क्रमांक - १८ सोमवार दिनांक ८/४/२०१३

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेचे राजीव आवास योजने अंतर्गत झोपडपट्टयांचे सोशिओ इकॉनॉमिक सर्व्हे GIS,MIS,सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे,बांधकामावर सुपरव्हिजन करणे इत्यादी करीता एजन्सी नियुक्तीबाबत मा.स्थायी समिती ठराव क्र.८२ दि.२४/१/२०१३ च्या ठरावान्वये प्रस्तावावर ऑफिस रिपोर्ट फेरसादर. व प्रकल्प विभाग जा.क्र. २२९५ दिनांक ०३/४/२०१३ रोजीचा ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. प्रकल्प विभाग दिनांक २६/०३/२०१३

संदर्भ - १] मा.स्थायी समिती ठराव प्रकल्प विभागास प्राप्त दि.११/०३/२०१३

२] मा.सभापती स्थायी समिती यांचे दि.१४/०३/२०१३ अन्वयचे पत्र

३] प्रकल्प विभाग जा.क्र. १६७ दि.१५/०३/२०१३ अन्वये वाप्कोस लि. यांना दिलेले पत्र

४] वाप्कोस लि. यांचे दि.१४/०३/२०१३ चे पत्र

५] वाप्कोस लि. यांचे दि.२५/०३/२०१३ चे पत्र

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सादर करण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेची राजीव आवास योजने अंतर्गत झोपडपट्टयांचे सोशिओ इकॉनॉमिक सर्व्हे,GIS,MIS,सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, बांधकामावर सुपरव्हिजन करणेबाबत ई- निविदा क्र.४०७ बाबत प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता मा.स्थायी समिती कडे सादर केला असता मा.स्थायी समितीने खालीलप्रमाणे ठराव पारित केला आहे.

**ठराव :-अहमदनगर महानगरपालिकेचे राजीव आवास योजने अंतर्गत झोपडपट्टयांचे सोशिओ इकॉनॉमिक सर्व्हे,GIS,MIS,सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, बांधकामावर सुपरव्हिजन करणे इत्यादी करीता एजन्सी नियुक्तीबाबत मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्टवर झालेल्या चर्चेनुसार पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.**

**मा. केंद्र शासनाच्या राजीव आवास योजने अंतंगत संपुर्ण झोपडपट्टी मुक्त शहर होणार आहे. शहरातील गोरगरीब जनतेसाठी ही योजना काळाची गरज असल्याने त्याचे काम लवकरात लवकर होणे आवश्यक आहे. नगरोत्थान योजनेतील या एजन्सीची कामाची गती दिसत नाही. आवश्यक तेवढे अभियंते नेमलेले नसून ऑफिसही सुरू केलेले नाही. ही बाब लक्षात घेता. ही योजना लवकरात लवकर मार्गी लावण्याचे दृष्टीने वाप्कोस लिमिटेड, गुजरात हे काम करीत असलेल्या इतर ठिकाणची तपशीलवार माहितीसह त्यांचे प्रतिनिधीना उपस्थित ठेवणेबाबत कळवून निविदादर मंजुरीचा सविस्तर प्रस्ताव तातडीने सादर करण्यांत यावा. नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.**

त्यानुसार संदर्भिय पत्र क्र. ३ अन्वये वाप्कोस लि. या एजन्सीस त्यांचे राजीव आवास योजने अंतर्गत इतर मनपामध्ये चालू असलेल्या कामाचे सद्यस्थिती बाबत माहिती मागविणे बाबत पत्र दिले असता सदर एजन्सीने संदर्भ पत्र क्र.५ अन्वये कल्याण डोबिवली मनपा येथील त्यांचे चालू असलेल्या कामाबाबत प्रमाणपत्र सादर केले आहे. सदर प्रमाण पत्रामध्ये वाप्कोस लि. या एजन्सीचे कल्याण डोंबिवली मनपा मधील काम समाधानकारक असल्याचे नमुद करण्यात आले आहे.

तसेच संदर्भिय पत्र क्र.४ अन्वये वाप्कोस लि. या एजन्सीने त्यांचे नगर येथे कार्यालय सुरू केले बाबत नमुद केलेले आहे.त्यानुसार वरील प्रमाणे माहिती मा.स्थायी समिती कडेस सादर करणेबाबत आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे प्रकल्प अभियंता यांचा अहवाल असे.

यावर मा. नगररचनाकार यांचा सहमती दर्शक सही

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, सदरचा अहवाल विचारार्थ मा.स्थायी समिती समोर ठेवणे योग्य. सबब आदेशार्थ.

यावर मा.आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, प्रस्तावीत केलेनुसार मान्य.

---oooo---

अहमदनगर महानगरपालिका
प्रकल्प विभाग जा.क्र. २२९५
दिनांक ०३/०४/२०१३

संदर्भ - १] मा.स्थायी समिती ठराव प्रकल्प विभागास प्राप्त दि.११/०३/२०१३
२] मा.सभापती स्थायी समिती यांचे दि.१४/०३/२०१३ अन्वयचे पत्र
३] प्रकल्प विभाग जा.क्र.१६७दि.१५/०३/२०१३अन्वये वाप्कोस लि. यांना दिलेले पत्र
४] वाप्कोस लि. यांचे दि.१४/०३/२०१३ चे पत्र
५] वाप्कोस लि. यांचे दि.२५/०३/२०१३ चे पत्र
६] प्रकल्प विभागाकडील जा.क्र. १७५ दि.३०/०३/२०१३ अन्वये मा.स्थायी समिती कडे सादर करण्यांत आलेला प्रस्ताव.
७]कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांचे वाप्कोस लि.यांना देण्यांत आलेले जा.क्र. कडोमपा / काअ / बिएसयुपी /११३,दि.३०/०३/२०१३च्या पत्राचा दि.०१/०४/२०१३ रोजी मनपास प्राप्त फॅक्स.

सविनय सादर,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सादर करण्यात येते की,राजीव आवास योजने अंतर्गत झोपडपट्ट्यांचे सोशिओ इकॉनॉमिक सर्व्हे,GIS,MIS,सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे,बांधकामावर सुपरव्हिजन करणे इत्यादी करीता एजन्सी नियुक्तीबाबत मा.स्थायी समिती सभा क्र.१५विषय क्र.८२दि.२४/१/२०१३च्या ठरावान्वये प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे सादर करण्यात आलेला आहे.

सदर प्रस्तावामध्ये वाप्कोस लि.कंपनी यांनी कल्याणडोंबिवली महानगरपालिका येथील पत्र क्र.KDMC/EE/BSUP/122Date25/03/2013अन्वये दिलेल्या पत्रानुसार सदरचे काम समाधान कारक असलेबाबत कळविले होते.परंतु मनपास दि.०१/०४/२०१३रोजी सांयकाळी ५.३०वा.कल्याण डोंबिवली महानगरपालिका,कल्याण यांनी वाप्कोस लि. या एजन्सीज दिलेल्या पत्राचा मनपास फॅक्स

प्राप्त झाला आहे. सदर पत्रामध्ये कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांनी राजीव आवास योजने संदर्भात वाप्कोस लि.यांना देण्यांत आलेले दि.२५/०३/२०१३चे पत्र रद्द करण्यात आल्याबाबत कळविले आहे.सदर बाबत मा.आयुक्त यांच्याशी समक्ष चर्चा केली असता मा.आयुक्त यांनी मा.आयुक्त कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांच्याशी संदर्भिय पत्र क्र.७बाबत दुरध्वनी वरून चर्चा केली. मा.आयुक्त कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांनी वाप्कोस लि. यांचे कल्याण डोंबिवली येथील राजीव आवास योजने संदर्भाचे काम समाधानकारक नसल्याबाबत सांगितले व त्यामुळे संदर्भिय पत्र क्र.७अन्वये सदरचे पत्र वाप्कोस लि. यांना दिले असल्याचे कळविले संदर्भिय पत्र क्र.७ बाबत वाप्कोस लि. यांनी अहमदनगर महानगरपालिकेस कुठलीही कल्पना दिली नाही. तरी सदर बाबत वस्तुस्थिती मा.स्थायी समिती कडेस सादर करणेबाबत आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे प्रकल्प अभियंता यांचा अहवाल असे.

यावर शहर अभियंता यांचा सहमती दर्शक सही

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, सदर प्रस्तावाप्रमाणे वस्तुस्थिती मा.स्थायी समिती समोर निर्णयार्थ ठेवणे योग्य आदेशार्थ सादर.

यावर आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, प्रस्तावीत केलेनुसार मान्य दि.३/४/२०१३

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :-राजीव आवास योजने अंतर्गत झोपडपट्टयांचे सोशिओ इकॉनॉमिक सर्व्हे GIS,MIS,सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे,बांधकामावर सुपरव्हिजन करणे इत्यादी करीता एजन्सी नियुक्तीबाबत विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री.सातपुते दि.ना. :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

शहर अभियंता श्री. कुलकर्णी :- राजीव गांधी आवास योजनेसाठी , अहवाल तयार करणेकामी नेमलेल्या वाप्कोस लि. या यांचे काम समाधानकारक असल्याचा अभिप्राय कल्याण डोंबिवली मनपाने पत्राने कळविला होता. परंतु नंतर या कंपनीचे काम समाधानकारक नसल्याचे कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांनी कळविले आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- जर यांचे काम समाधानकारक नाही. तर सेंकड निविदा धारकास दयायला हरकत नाही.

उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे :- कमर्शीयल लिफाफा ओपन केल्यानंतर आपल्याला कळले. त्यामुळे सेंकड निविदा धारकास देता येणार नाही.

मा.श्री. सातपुते दि.ना.:- त्यांचे काम योगय नसेल तर हे टेंडर रद्द करा.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- अल्पकालीन नवीन टेंडर करा.

मा.सभापती साहेब :- ७ दिवसाची टेंडर नोटीस प्रसिध्द करावी.

शहर अभियंता श्री. कुलकर्णी :- १५ दिवसाची निविदा प्रसिध्द करणे योग्य राहील.

मा.सौ. खरमाळे सं.र. :- ऑफिस रिपोर्ट पहाता वाप्कोस लि. चे काम समाधानकारक नसल्याने फेरनिविदा मागविण्यांत यावी.

मा.सौ. गंधे सु. मो. :- फेर निविदा मागविण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- मा.छाननी समितीचा तुलनात्मक तक्ता पहाता वाप्कोस लि. यांनी वजा ११.६५% दराने निविदा दाखल केलेली आहे.तथापि सदर वाप्कोस लि. एजन्सी हे इतर ठिकाणी करीत असलेल्या कामाचा अहवाल मागीतला असता. मा.आयुक्त कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांनी वाप्कोस लि. यांचे राजीव आवास योजनेचे काम समाधानकारक नसल्याबाबत सांगितले. तसेच वाप्कोस लि. यांना दिलेले पत्र रद्द केल्याचे कळविलेले आहे. राजीव आवास योजने अंतर्गत हे काम लवकरात लवकर होणे ही गरजेचे आहे. या योजनेस मा. शासनाचे अनुदान प्राप्त होणार असल्याने दर्जेदार एजन्सीची नेमणूक करणेही महत्वाचे आहे. त्यामुळे कामास गती प्राप्त होउन शहर झोपडपट्टी मुक्त होण्यास मदत होईल व गोरगरीब जनतेस घर उपलब्ध होतील. उपरोक्त सर्व बाबींचा सर्व निकष विचार करता वाप्कोस यांनी जरी वजा ११.६५% इतकी देकार रकमेची निविदा जरी सादर केली असली तरीही त्यांचे कामाबाबत आलेला अहवाल व इतर माहितीचा विचार करता राजीव आवास योजनेचे काम वाप्कोस यांना देणे हे महानगरपालिकेचे हिताच्या दृष्टीने योग्य नाही. त्याकरीता नव्याने फेर निविदा मागविण्यांस सर्वानुमते मंजुरी दयावी.

**<u>ठराव</u>** :-अहमदनगर महानगरपालिकेचे राजीव आवास योजने अंतर्गत झोपडपट्टयांचे सोशिओ इकॉनॉमिक सर्व्हे GIS,MIS,सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे,बांधकामावर सुपरव्हिजन करणे इत्यादी करीता एजन्सी नियुक्तीबाबत मा.स्थायी समिती ठराव क्र.८२ दि.२४/१/२०१३ च्या ठरावान्वये प्रस्तावावर ऑफिस रिपोर्ट फेरसादर. व प्रकल्प विभाग जा.क्र. २२९५ दिनांक ०३/४/२०१३ रोजीचा ऑफिस रिपोर्टानुसार सभेत झालेल्या चर्चेनुसार पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

राजीव आवास योजना बाबत निविदा बोलविण्यांत आली होती.मा.छाननी समितीचा तुलनात्मक तक्ता पहाता वाप्कोस लि., गुजरात यांनी वजा ११.६५% दराने निविदा दाखल केलेली आहे.तथापि वाप्कोस लि. गुजरात हे इतर ठिकाणी करीत असलेल्या कामाचा अहवाल मागीतला असता. मा.आयुक्त कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांनी वाप्कोस लि. यांचे राजीव आवास योजनेचे काम समाधानकारक नसल्याबाबत सांगितले. तसेच वाप्कोस लि. यांना दिनांक २५/३/२०१३ रोजी दिलेले पत्र जा.क्र.कडोमपा /काअ/बिएसयुपी /११३, दिनांक ३०/०३/२०१३च्या पत्रान्वये रद्द केल्याचे कळविलेले आहे. या योजनेस मा. शासनाचे अनुदान प्राप्त होणार असल्याने दर्जेदार एजन्सीची नेमणूक करणेही महत्वाचे आहे.

त्यामुळे कामास गती प्राप्त होउन शहर झोपडपट्टी मुक्त होण्यास मदत होईल व गोरगरीब जनतेस घर उपलब्ध होतील. त्याकरीता राजीव आवास योजने अंतर्गत होणारे काम लवकरात लवकर होणे ही गरजेचे आहे. उपरोक्त सर्व बाबींचा सर्व निकष विचार करता वाप्कोस लि. गुजरात यांनी जरी वजा ११.६५% इतकी देकार रकमेची निविदा सादर केली असली तरीही त्यांचे कामाबाबत आलेला अहवाल व इतर माहितीचा विचार करता राजीव आवास योजनेचे काम वाप्कोस लि. गुजरात यांना देणे हे महानगरपालिकेचे हिताच्या दृष्टीने योग्य वाटत नाही. सबब तातडीने फेर निविदा मागविण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येत आहे. नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ. खरमाळे संगीता रत्नाकर सही /-

अनुमोदक :- मा.सौ.गंधे सुमन मोहनीराज सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर,

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका